लोकशाही वार्ता
# चंद्रपूर
गुड मॉर्निंग
नागपूर, सोमवार, १४ जुलै २०२५/९
epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta


### ऑटोतून प्रवासादरम्यान १४ हजार रु. लंपास

**वर्धा :** ऑटोतून प्रवासादरम्यान १४ रुपये तसेच पासबुक असलेली थैली चोरट्यांनी लंपास केली. ही घटना ९ जुलै रोजी आर्वी येथे घडली. आर्वी येथील खरडी वॉर्ड परिसरात राहणारे मधुकर बोधणे यांनी बँकेतून १४ हजार रुपये काढले. घरी जााण्याकरिता बँकेसमोर गेल्यानंतर ते ऑटोत बसले. दरम्यान, तोंडाला कापड बांधून असलेल्या दोन महिला ऑटोत बसल्या. घरी गेल्यानंतर पिशवीत बघितले असता पैसे तसेच पासबुक दिसले नाही. पिशवी कापून अज्ञात महिलांनी १४ हजार रुपये तसेच बँकेचे पासबुक लंपास केल्याची तक्रार पोलिसांत करण्यात आली.

### ट्रॅव्हल्समधून प्रवासात ५० हजार रुपये चोरी

**वर्धा :** ट्रॅव्हल्समधून प्रवासादरम्यान महिलेजवळील ५० हजार रुपये अज्ञाताने चोरून नेले. ही घटना तळेगाव (टा.) शिवारात घडली. सोनेगाव (स्टे.) येथील फियार्दीने महिला बचतगटाचे ५० हजार रुपये वर्ध्यातील बँकेतून काढले. ती रक्कम घेऊन हिंगणघाकडे जाणाऱ्या ट्रॅव्हल्समध्ये सोनेगाव (स्टे.) येथे जात होत्या. प्रवासादरम्यान बाजूला बसलेल्या दोन अज्ञात महिलांनी फिर्यादीच्या बॅगमधून ५० हजार रुपये लंपास केले. याप्रकरणी तक्रारीवरून अल्लीपूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

# महापालिकेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर

## नवीन तंत्रज्ञानाची कास धरत कार्यक्षम व पारदर्शक प्रशासनाची दिशा

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

राज्य शासनाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या १५० दिवस कार्यक्रम अंतर्गत चंद्रपूर महानगरपालिकेने प्रशासनात नावीन्यपूर्ण बदल घडवून आणत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय)चा वापर विविध विभागांमध्ये सुरू केला आहे. यामुळे नागरिक सेवा अधिक गतिमान, पारदर्शक आणि प्रभावी होण्यास मदत मिळत आहे.

मागील काही दिवसात एआयची मदत घेऊन कोण-कोणत्या विभागात कशापद्धतीने बदल घडवून कामाची गती वाढवता येईल त्या दृष्टिकोनातून प्रयत्न केले जात आहेत. मनपाच्या प्रत्येक विभागाने कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून त्यांच्या विभागाचे काम कसे सुलभ करता येईल तसेच काय नावीन्यपूर्ण बदल करता येईल याचे पीपीटीद्वारे सादरीकरण आयुक्तांपुढे केले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा कल्पक वापर करणाऱ्या विभागांना पुरस्कृत करण्यात येणार आहे.



बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग, यांत्रिकी, कोर्ट विभाग, जनसंपर्क विभाग, आस्थापना, निवडणूक, स्टोर विभाग, अतिक्रमण, नगर रचना, आरोग्य, स्वच्छता, ग्रंथालय, संगणक, शिक्षण विभाग, विद्युत विभाग, समाज कल्याण, अग्निशमन विभाग इत्यादी सर्व विभागाद्वारे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापर मोठ्या प्रमाणावर करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

शासकीय कामकाजाच्या टिपणी, पत्र, नोंद, संशोधन याबाबत मार्गदर्शन घेऊन काम जलद गतीने करण्यास मदत होते. वापर शासकीय पुस्तक, जीआर किंवा माहिती असलेले कागदपत्र अपलोड करुन संक्षिप्त प्रश्नांची उत्तरे जलद गतीने शोधुन मिळण्यास मदत होते. शासकीय कामकाजाचे पीपीटी करण्यास मदत होते आहे. एआयचा वापर मानसिक आरोग्य उत्तम राहण्यासाठी निगडीत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे तसेच उपचार घेण्यासाठी फायदा होतो.

### बदल घडवण्याची दिशा

१५० दिवस कार्यक्रम हे केवळ एक उद्दिष्ट नव्हे, तर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बदल घडवण्याची दिशा आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य वापर करून प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान करण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे महापालिका आयुक्त विपीन पालिवाल यांनी सांगितले.

# मोतिबिंदूमुक्त महाराष्ट्र विशेष मोहीम

## २२ जुलै ते २२ ऑगस्ट या कालावधीत आयोजन

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

महाराष्ट्रातील नागरिकांचे नेत्रस्वास्थ सुधारण्यासाठी तसेच वाढत्या मोतिबिंदूची संख्या व सर्वसामान्य आणि गरीब जनतेपर्यंत सेवा पुरविण्याच्या उद्देशाने अंधत्व निर्मूलनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून मोतिबिंदूमुक्त महाराष्ट्र मोहीम राबविण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मोतिबिंदूमुक्त महाराष्ट्र ही विशेष मोहीम जिल्हा सामान्य रुग्णालय व कर्मवरी मा.सां. कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे. ही मोहीम २२ जुलै ते २२ ऑगष्ट २०२५ या कालावधीत राबविली जाणार आहे. या मोहिमेमध्ये जिल्ह्यातील सर्व मोतीबिंदू रुग्णावर मोफत उपचार केले जाणार आहेत.

यासंदर्भात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे यांनी तालुका वैद्यकीय अधिकारी, रुग्णालयांचे वैद्यकीय अधिक्षक तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी यांची व्ही.सी. द्वारे सभा घेवून अधिनस्थ अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, आरोग्य सेवक/सेविका, समुदाय आरोग्य अधिकारी, नेत्रचिकित्सा अधिकारी यांना सदर मोहिमेचे उद्दिष्ट, नियोजन व अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश दिले.

### रुग्णांनी मोहिमेचा लाभ घ्यावा

मोतिबिंदूच्या रुग्णांचे वेळीच निदान करणे, गरजू रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करणे, अंधत्व रोखणे व जनजागृती वाढविणे, ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत सेवा पोहचविणे हे आहे. संपूर्ण जिल्हाभर या मोहिमेचे नियोजन करण्यात आले असून अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, आरोग्य सेवक/सेविका यांच्यामार्फत गृहभेटी देवून मोतिबिंदूग्रस्त रुग्णांना शोधून त्यांच्यावर मोफत उपचार करण्यात येणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व मोतिबिंदूग्रस्त रुग्णांनी या मोहिमेचा लाभ घेऊन मोफत उपचार करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी केले आहे.

# राष्ट्रीय हरित सेना विभाग वार्षिक सार्वत्रिक निवडणूक



**लोकशाही वार्ता/राजुरा**

आदर्श मराठी प्राथमिक विद्यामंदिर तथा आदर्श हायस्कूल राजुरा येथील राष्ट्रीय हरित सेनेच्या विद्यार्थी प्रतिनिधी पदाची वार्षिक सार्वत्रिक निवडणूक पार पडली.

सामाजिक वनीकरण विभाग परिक्षेत्र राजुरा अंतर्गत राष्ट्रिय हरीत सेना विभाग वर्षभर विविध पर्यावरणपूरक जनजागृती उपक्रम ,कार्यक्रम राबवितात. लोकशाही पद्धतीने होणारी सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया ही बालवयात विद्यार्थ्यांना कळावी त्याचे प्रात्यक्षिक अनुभवता यावे याकरिता इयत्ता आठवीच्या राष्ट्रीय हरित सेनेच्या विद्यार्थ्यांची निवडणूक मतदान प्रक्रिया राष्ट्रीय हरित सेना विभाग प्रमुख बादल बेले यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. विशेष म्हणजे सर्व शिक्षकांनीही या प्रक्रियेत सहभागी होत मतदान केले. एकूण ७७ विद्यार्थी व १५ शिक्षकांनी मतदानाचा हक्क बजावला.

विद्यार्थिनी प्रतिनिधी पदाकरीता उभे असलेल्या विद्यार्थिनीचे बोधचिन्ह गुलाब, शेवंती, मोगरा, जास्वंद, झेंडू असे होते तर विद्यार्थी प्रतिनिधी उमेदवारांना वड, पिंपळ, चिंच, कडुनिंब असे चिन्ह देण्यांत आले होते. अत्यंत पर्यावरणपूरक वातावरणात ही निवडणूक संपन्न झाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मुख्याध्यापक सारीपुत्र जांभूळकर, मतदान केंद्राध्यक्ष म्हणून मुख्याध्यापिका नलिनी पिंगे, मतदान अधिकारी म्हणून विद्यार्थिनी अनुष्का वांढरे, मानसी बोबडे ,निकिता वानखेडे यांनी जबाबदारी पार पाडली.

१०७ पैकी ९२ मते वैध तर १४ मते अवैध ठरली. प्राप्ती पावडे ला ६० मते, हिमांशू येवले ला ५९ मते घेत बहुमताने विजयी झाले. वर्षभरातील राष्ट्रीय हरित सेनेच्या उपक्रम कार्यक्रमाचे वेळापत्रक तयार करून शासनाच्या निर्देशानुसार विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येते.

# आज प्रधानमंत्री शिकाऊ उमेदवारी मेळावा

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत क्रांतिवीर बाबुराव शेडमाके शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), गडचिरोली येथे १४ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजता उमेदवारी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्याचे उद्दिष्ट आयटीआय पास, शिकत असलेले व माजी विद्यार्थी यांना स्थानीय व नामांकित उद्योगांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हे आहे. लॉईड मेटल्स यांच्यासह अनेक नामवंत कंपन्यांचे प्रतिनिधी या मेळाव्यात सहभागी होणार आहेत. योजना ही केंद्र सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता विभागामार्फत राबवली जाणारी महत्वाकांक्षी योजना असून, शिकाऊ उमेदवारीच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थ्यांना प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव मिळतो. यामुळे केवळ रोजगारच नव्हे तर स्वयंरोजगाराच्या संधी देखील उपलब्ध होतात.

या मेळाव्याचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक प्रशिक्षण सल्लागार प्रणाली दहाटे (बीटीआरआय, चंद्रपूर) व संस्थेचे प्राचार्य चौधरी यांनी केले आहे. निवड झालेल्या उमेदवारांना शासकीय नियमानुसार कंपनीकडून सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. मेळाव्याचे आयोजन शासकीय आयटीआय गडचिरोली आणि बीटीआरआय चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येत असून इच्छुक उमेदवारांनी स्वखर्चाने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : बावनकर, गट निदेशक, शास. आयटीआय, गडचिरोली आणि योगेश धवणे, बीटीआरआय, आयटीआय चंद्रपूर यांच्याशी संपर्क साधावा.

### संधीचा लाभ घेण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन

# भद्रावती येथे जादूटोण्याचा प्रकार उघडकीस; भद्रावती पोलिसात तक्रार दाखल



**लोकशाही वार्ता/भद्रावती**

शहरातील शिवाजीनगर येथे जादू टोण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सदर घटनेची तक्रार भद्रावती पोलीस ठाण्यात करण्यात आल्यानंतर भद्रावती पोलिसांनी घटनास्थळी जाऊन जादूटोण्याचे साहित्य जप्त केले व अज्ञात आरोपीविरुद्ध जादूटोणाविरोधी कायदे अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

शिवाजीनगर येथे मोहम्मद शाहिद अब्दुल रज्जाक हे इसम राहतात. रविवारी सकाळी त्यांची सून नेहा यांनी दार उघडले असता दरवाजासमोर अंगणात कापलेले लिंबू, त्यावर हळद कुंकू, खिळे, विलायची, रक्षा, लवंग असे पूजेचे साहित्य कोणीतरी अज्ञात इसमाने टाकल्याचे लक्षात आले.

त्यांनी सदर प्रकाराची तक्रार भद्रावती पोलिसात केल्यानंतर भद्रावती पोलिसांनी घटनास्थळी येऊन सर्व साहित्य जप्त केले व अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला. घटनेचा पुढील तपास भद्रावती पोलीस करीत आहे.

# रस्त्यांची कामे पूर्ण झाल्याशिवाय खोदकाम करू नका - आ. जोरगेवार

## शहरातील अमृत योजनेच्या कामांची पाहणी



**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

शहरातील सिवरेज लाईन आणि अमृत योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांची रविवारी आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिकार्यांसह पाहणी केली. शहरातील बहुतांश रस्ते खोदण्यात आले असून त्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. खोदलेले रस्ते दुरुस्ती झाल्याशिवाय नवीन खोदकाम न करण्याचे सक्त निर्देश यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना दिले आहे.

यावेळी चंद्रपूर महानगर पालिकेचे अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, शहर अभियंता रवींद्र हजारे, एमजीपीचे कापसे, भारतीय जनता पार्टीचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, दशरथसिंह ठाकूर, मंडळ अध्यक्ष प्रदिप किरणे, दिवाकर पूटड्डवार यांच्यासह कंत्राटदारांची व स्थानिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.पाहणी दरम्यान आमदार जोरगेवार यांनी खोदलेले रस्ते व्यवस्थित दुरुस्त केल्याशिवाय पुढील कोणतेही खोदकाम सुरू करू नये. नागरिकांची गैरसोय रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करण्याच्या सूचना दिल्या. तसेच, आधी खोदलेले आणि निकृष्ट अवस्थेत असलेले रस्ते तातडीने डागडुजी करून नागरिकांना दिलासा द्यावा, असेही निर्देश दिले.

रस्त्यांची दुरवस्था, धुळीचे लोट, वाहतुकीतील अडथळे आणि पावसाळ्यात होणारे चिखलाचे साम्राज्य यामुळे नागरी जीवन विस्कळीत झाले आहे. नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका. कामे करताना जनतेचा त्रास कमी करण्याचे कर्तव्य प्रशासनाचे आहे. नागरिकांनीही जर डागडुजी न झाल्यास अशा नवीन खोदकामाला विरोध करावा असे आवाहनही आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. शहरातील पायाभूत सुविधांशी संबंधित ही कामे महत्त्वाची असली तरी त्याच्या अंमलबजावणीत गंभीर त्रुटी दिसून येत आहेत. कामांची गुणवत्ता, वेळेत होणारी दुरुस्ती आणि योग्य व्यवस्थापन या सर्व बाबींवर लक्ष ठेवले जाईल, असे आमदार जोरगेवार यांनी स्पष्ट केले. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी रयतवरी कॉलरी, महाकाली कॉलरी परिसरासह शहरातील इतर भागांची पाहणी केली.

# महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या माजी नगरसेवकांची बैठक



**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

आगामी चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज माजी नगरसेवकांची महत्त्वाची बैठक पार पडली. राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर आणि आमदार किशोर जोरगेवार यांनी माजी नगरसेवकांना मार्गदर्शन करताना जनसंपर्क वाढविण्याच्या तसेच नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्याच्या सूचना केल्या.

या बैठकीला महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, उपमहापौर अनिल फुलझेले, भाजप नेते अशोक जिवतोडे, युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष रघुवीर अहिर, प्रकाश देवतळे, अजय जयस्वाल, दशरथ सिंह ठाकूर, मंडळ अध्यक्ष प्रदीप किरमे, रवी जोगी, ॲड. सारिका संदुरकर, स्वप्नील डुकरे, भारतीय जनता पार्टीचे राज्य परिषद सदस्य तुषार सोम, वनिता कानडे यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे सर्व माजी नगरसेवक उपस्थित होते. या बैठकीत पक्ष संघटना अधिक बळकट करण्यावर विशेष भर देण्यात आला. प्रभागातील स्थानिक समस्या, कार्यकर्त्यांच्या अडचणी आणि नागरिकांच्या अपेक्षा यावर सविस्तर चर्चा झाली. पक्ष कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधत समस्या समजून घेण्याचा आणि त्यावर ठोस उपाययोजना करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

यावेळी बोलताना राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर म्हणाले की, आपण केलेले काम आता प्रभावीपणे प्रभागातील नागरिकांपर्यंत पोहोचवा. पक्षाचे विचार प्रत्येक घरी पोहोचविणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. व्यक्तिकेंद्रित काम न करता पक्ष म्हणून संघटितपणे काम करा. पक्ष, जनसंपर्क आणि परिश्रम हा निवडणूक जिंकण्याचा मंत्र आहे, असे आवाहन त्यांनी सर्व माजी नगरसेवकांना केले.

यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी सांगितले की, आजची ही बैठक केवळ निवडणूक तयारीची नाही, तर आपल्या एकत्रित ताकदीचा आणि पक्ष संघटनेच्या दृढतेचा संकल्प करण्यासाठी आहे. आपल्या प्रत्येक प्रभागातील समस्या, कार्यकर्त्यांच्या अडचणी, नागरिकांच्या अपेक्षा या सगळ्या आपण प्रत्यक्ष जाणून घेतल्या पाहिजेत.

लोकांशी थेट संपर्क ठेवून त्यांच्या अडचणी सोडवणे हीच आपल्या कामाची खरी ओळख आहे. आपण एकसंघ राहून काम केले पाहिजे असे ते म्हणाले. या कार्यक्रमात भारतीय जनता पार्टीचे राज्य परिषद सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल तुषार सोम यांचा सत्कार करण्यात आला.

# गार्गी निंबोळ शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्यात प्रथम



**लोकशाही वार्ता/सावली**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे ९ फेब्रुवारी २०२५ घेण्यात आलेल्या इयत्ता ८ वी च्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. ख्रिस्तानंद स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ब्रम्हपुरी येथील विद्यार्थिनी गार्गी तुलसीदास निंबोळ ही चंद्रपूर जिल्ह्यातून ग्रामीण आणि शहरी दोन्ही विभागातून ७५ टक्के गुण घेऊन गुणवत्ता यादीत प्रथम आली. तिला इयत्ता ५ वी मध्येही शिष्यवृत्ती मिळाली होती. तिची यावर्षी इयत्ता नववी करिता नवोदय विद्यालय तळोधी जिल्हा चंद्रपूर येथेही निवड झाली होती हे विशेष. तिने आपल्या यशाचे श्रेय्य शाळेतील शिक्षक,शिक्षिका तसेच आई वडील यांना दिले आहे.

# परीक्षा झाल्यावर एका आठवड्यात पालक सभा

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

आपल्या पाल्याच्या प्रगतीचा आढावा घेण्याचा अधिकार प्रत्येक पालकांना आहे. विद्यार्थी शिक्षक व पालक यांच्यात समन्वय राहण्यासाठी पालकसभा अतिशय महत्त्वपूर्ण आहे. त्या अनुषंगाने आता जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये परीक्षा झाल्यावर एका आठवड्यात पालक सभा आयोजित करण्यात येणार आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा प्रकल्प सनियंत्रण कक्षाची सभा नुकतीच संपन्न झाली. या सभेत जिल्ह्यातील शैक्षणिक सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) नूतन सावंत, शिक्षणाधिकारी अश्विनी केळकर, राजेश पाताळे, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. विनित मत्ते, अधिव्याख्याता वैशाली येगलोपवार, उपशिक्षणाधिकारी विशाल देशमुख, गटशिक्षणाधिकारी व सर्व विषय सहायक उपस्थित होते. पालक, शिक्षक व विद्यार्थी यांच्यात समन्वय रहावा व पालकांना आपल्या पाल्याची प्रगती व अडथळे यांची माहिती व्हावी, यासाठी संपूर्ण जिल्ह्यात परीक्षा झाल्यावर एका आठवड्यात पालकसभांचे आयोजन करावे, अशा सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिल्या. शाळेत घेण्यात येणाऱ्या चाचण्यांमध्ये विद्यार्थ्यांनी मिळविलेले गुण पालकसभेत पेपर दाखवून देण्यात येणार आहे.

# पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा उद्या

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडल करिअर सेंटरआणि विवेकानंद महाविद्यालय, भद्रावती यांच्या संयुक्त विद्यमाने १५ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन विवेकानंद महाविद्यालय भद्रावती येथे करण्यात आले आहे.

१० वी, १२ वी, आय.टी.आय., पदविका, पदवी इत्यादी बेरोजगार उमेदवारांना विविध क्षेत्रात निर्माण होत असलेल्या रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने, राज्यांतील नामांकीत उद्योजकांचा थेट नोकरी इच्छुक उमेदवारांशी संपर्क करण्याच्या दृष्टीने, सदर रोजगार मेळावा आयोजित आहे.

या मेळाव्यामध्ये विविध नामांकित कंपन्या सहभागी होत आहे. यात ओमॅट प्रा.लि. चंद्रपूर यांचे बॉयलर ऑपरेटर, केमिस्ट, फिटर, वेल्डर, फिल्ड ऑपरेटर, इलेक्ट्रिशिअन, वेलफेअर ऑफिसर, ट्रेनी इत्यादी, मल्टी ऑरगॅनिक प्रा.लि.चंद्रपूर हेल्पर, फिटर, वेल्डर, के. एल. ग्रूप, हैदराबाद, यांचे वेअर हाऊस असोसिएट, सेक्युरिटी गार्ड, महाराष्ट्र कार्बन प्रा.लि. चंद्रपूर यांचे ट्रेनि, विदर्भ क्लिक सोल्युशन, चंद्रपूर यांचे फिटर, वेल्डर, इलेक्ट्रिशिअन, सनफायर प्रा.लि. चंद्रपूर यांचे फायरमॅन, भावन एनजी प्रा. लि. चंद्रपूर यांचे मॅनेजर जे.पि.असोसिएट ॲन्ड लॅबोरेटरीज प्रा.लि. चंद्रपूर यांचे एमएससी केमिस्ट, एस.बी.आय. लाईफ इंन्सूरन्स चंद्रपूर, यांचे फिल्ड वर्कर, डेक्सॉन इंजिनिअरींग प्रा.लि. नागपूर, यांचे मोटार मॅकेनिकल, इलेक्ट्रिशिअन, डिझेल मॅकेनिकल, वैभव इंटरप्रायझेस, नागपूर यांचे आय. टी. आय विद्यार्थ्यांकरिता मॅकेनिकल, संसुर सृष्टी प्रा.लि. चंद्रपूर यांचे बॅच मॅनेजर, फिल्ड एक्झुकेटीव्ह इत्यादी कंपन्याचे विविध पदे असल्याचे उद्योजकाकडून कळविण्यात आलेले आहे.

मेळाव्याकरिता उमेदवारांनी आधारकार्ड व शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्राचे झेराक्स प्रतीसह (कमीत कमी तीन प्रती) उपस्थित राहावे. मेळाव्यामध्ये सहभागी होण्याकरिता ttps://rojgar.mahaswayam.gov.in या वेबसाइटवर नोंदणी करावी. भरती इच्छुक नियोक्ते यांनी जास्तीत जास्त रिक्तपदे https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर अधिसूचित करावी. नोकरी इच्छुक उमेदवारांनी सदर वेबपोर्टलवर नोंदणी करावी तसेच लॉगीन करून शैक्षणिक पात्रतेनुसार अप्लाय करावा.

अधिक माहितीकरिता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, चंद्रपूर दूरध्वनी क्रमांक ०७१७२-२५२२९५ येथे संपर्क करावा. जिल्हातील जास्तीत जास्त उमेदवारांनी सहभागी होण्याचे व मेळाव्याचा लाभ घेण्याचे आवाहन सहायक आयुक्त अ.ला. तडवी यांनी केले आहे.

## वाघाने केली गायीची शिकार

**लाखनी:** जंगलात चराईसाठी गेलेल्या गायीवर वाघाने हल्ला करुन ठार केल्याची घटना तालुक्यातील पेंढरी/मोठी येथे उघडकीस आली. पेंढरी /मोठी येथे रतिराम डुकरू बोरकर यांचे मालकीच्या गाई जंगलात चराई करत असताना दोन गाईवर वाघाने हल्ला करून एकीस ठार केले. एक गाय जखमी आहे. यात पशुपालकाचे ५० हजाराचे नुकसान झाले आहे.खबरदारीचा उपाय म्हणून वन विभागाने ग्रामपंचायत कार्यालय येथे नोटीस लावून जंगलात जनावरे चारायला नेऊ नये व लोकांनी जंगलात जाऊ नये, याबाबत दवंडी देऊन संदेश देण्यात आला.





लोकशाही वार्ता

# भंडारा

नागपूर, सोमवार, १४ जुलै २०२५/१०


## कारधा येथे ४६ हजाराची घरफोडी

**भंडारा :** कारधा येथे अज्ञात चोरट्याने एका बंद घराचे कुलूप तोडून घरफोडी केली. या घटनेत चोरट्याने घरातील आलमारीचे लॉकरमधून ४६ हजाराचे रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केले. फिर्यादी सखाराम अजाबराव मेश्राम (४२, रा. कारधा,) हे त्यांच्या नातेवाईकांच्या घरी गेले असताना त्यांच्या घराचे गेट आणि मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्याने घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील आलमारीचे लॉकर फोडून सोन्याची नथ, जुने सोन्याचे मंगळसूत्र, अंगठी, सोन्याचा गोफ असा एकूण ४६ हजारांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी पोलिस ठाणे कारधा येथे अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta


### दृष्टिक्षेप

#### वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

**साकोली :** राष्ट्रीय महामार्गावरील लाखांदूर रोडवरील डोये वेल्डिंगजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत एकाचा जागी मृत्यू झाला असून दुसरा जखमी आहे. पिंपळगावमध्ये मजूरीचे काम करून ऑटोने साकोलीला परतत असताना, ऑटो चालकाने बोदरा रोडवर प्रवाशांना खाली उतरवले. त्यामुळे ऑटोमध्ये प्रवास करणारे पंकज रामू राऊत आणि अविनाश हेमराज शहारे हे पायी घरी परतत असताना, एका अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. यात पंकज रामू राऊत (३७ , रा. तलाव वॉर्ड, साकोली) यांचा जागीच मृत्यू झाला, तर तलाव वॉर्ड येथील अविनाश हेमराज शहारे (३१) जखमी झाले. घटनेनंतर अज्ञात चालक पळून गेला.

#### अंगणवाडी केंद्रातून टीव्ही चोरी

**लाखांदूर:** तालुक्यातील आसोला गावातील अंगणवाडी केंद्रातून एलईडी टीव्ही चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात लाखांदूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी देवका माधव तुपटे (५४, रा. आसोला, ता. लाखांदूर) या अंगणवाडी सेविका असून त्या आसोला येथील नवीन अंगणवाडी इमारतीत कार्यरत आहेत. शासनामार्फत मिळालेली १५ हजार रुपये किंमतीची एलईडी टीव्ही अंगणवाडीमध्ये बसविण्यात आली होती.

#### सर्पदंशामुळे तरुणाचा मृत्यू

**भंडारा :** सर्पदंश झाल्याने उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या तरुणाचा मृत्यू झाला. निखील लंकेश्वर बागडे (३०, रा. घोगरा, ता. तिरोडा, जि. गोंदिया) असे मृतकाचे नाव आहे. निखिलला सर्पदंश झाल्याने सुबोध हॉस्पिटल, तुमसर येथून पुढील उपचारासाठी सामान्य रुग्णालय, भंडारा येथे आणण्यात आले. मात्र, रुग्णालयात दाखल केल्यानंतर तपासणीनंतर डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

#### उपचारादरम्यान तरुणाचा मृत्यू

**लाखांदूर :** प्रकृती बिघडल्याने उपचारादरम्यान एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. नरेश सुधाकर दुपारे (३५, रा. सोनी, ता. लाखांदूर) असे मृतकाचे नाव आहे. मृतक नरेश याची प्रकृती अचानक खालावल्याने प्रथम उपजिल्हा रुग्णालय, लाखांदूर येथे दाखल करण्यात आले. नंतर जिल्हा रुग्णालय, भंडारा येथे आणण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. भंडारा पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# विहिरीतील विषारी वायूमुळे गुदमरून शेतकऱ्याचा मृत्यू

### पालांदूर शेतशिवारातील घटना



घटनास्थळाची पाहणी करताना तहसीलदार. इन्सेटमध्ये मृतक छगन गोटेफोडे.

**लोकशाही वार्ता/पालांदूर**

विहिरीतील पाण्यात बुडालेला विद्युत मोटरपंप बाहेर काढण्यासाठी विहिरीत उतरलेल्या एका तरुण शेतकऱ्याचा विहिरीतील विषारी वायूगळतीमुळे मृत्यू झाल्याची घटना लाखनी तालुक्यातील पालांदूर येथील मऱ्हेगाव मार्गावरील शेतशिवारात रविवारी (दि.१३) सकाळी ६.३० वाजताच्या सुमारास घडली. छगन बाळकृष्ण गोटेफोडे (४२) असे मृतक तरुण शेतकऱ्याचे नाव आहे.

पालांदूर येथील नरेश देवराम तलमले यांनी भाड्याने केलेल्या अंताराम गायधने यांच्या मालकीच्या शेतातील विहिरीत खाली उतरून छगन गोटेफोटे हा मोटरपंप काढत असताना त्यास गुदमरल्यासारखे वाटल्याने त्याने वर चढण्याचा प्रयत्न केला. वर चढत असतानाच अचानक तो विहिरीत पडून विषारी वायुने गुदमरून मरण पावला. अशा प्रकारची फिर्याद मृतकाचा मोठा भाऊ गोविंदा बाळकृष्ण गोटेफोडे याने दिली आहे.

घटनेच्या वेळी परिसरातील लोक धावून आले. मात्र विहिरीत उतरुन त्यास बाहेर काढण्यासाठी कुणीच विहिरीत उतरले नाही. गावकऱ्यांना विहिरीत विषारी वायू असल्याचा संशय आल्याने विहीरीत पेटता टेंभा टाकल्याने तो विझला व कोंबडीचे पिल्लू टाकले असता पिल्लू बेशुद्ध झाले.

त्यानंतर या घटनेची माहिती गावकऱ्यांनी पालांदूर पोलिसांना दिली. माहिती मिळताच पालांदूरचे ठाणेदार सतीश बन्सोड आपल्या ताफ्यासह घटनास्थळी दाखल झाले. लाखनीचे तहसीलदार धनंजय देशमुख यांचे समक्ष भंडारा अग्निशामक दलाचे समीर गणवीर व त्यांच्या ताफ्यातील रवी, अमित, विलास, प्रणय या कर्मचाऱ्यांनी स्थानिक पोलिसांच्या मदतीने विहिरीत पडलेल्या छगन गोटेफोडे याचा मृतदेह बाहेर काढण्यात आले. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी लाखनी येथील ग्रामीण रुग्णालयातील पाठविण्यात आले. या प्रकरणाचा तपास ठाणेदार सतीश बन्सोड यांच्या मार्गदर्शनात पोलिस हवालदार देवेंद्र मासूरकर करीत आहेत.

#### गोटेफोडे कुटुंबीयांवर शोककळा

छगन गोटेफोडे हा दैनंदिन मजुरीची कामे करून आपला व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवायचा. त्याच्या परिवारात पत्नी असून १ मुलगा व १ मुलगी माध्यमिक शिक्षण घेत आहेत. त्याच्या अकस्मात मृत्यूने गोटेफोडे कुटुंबीयांनी घरचा कर्तापुरुष गमावला असल्याने संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे.

# शीला आगाशे ठरल्या निवडणुकीसाठी पात्र

### प्रकरण बीडीसीसी बँक निवडणुकीचे

**लोकशाही वार्ता/मोहाडी**

तालुक्यातील रोहणा येथील रहिवाशी शीला हंसराज आगाशे यांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत मोठा दिलासा मिळाला आहे. निवडणूक निर्णय अधिकारी (बीडीसीसी बँक निवडणूक) यांनी त्यांचे दोन्ही नामनिर्देशन पत्र अवैध ठरविले होते. मात्र अपील अधिकाऱ्यांनी हा निर्णय रद्द करून शीला आगाशे यांना निवडणूकीसाठी पात्र ठरविले आहे.

आगाशे यांनी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था ता.मोहाडी व महिला राखीव या गटातून नामनिर्देशन पत्र भरले होते. छाननी दरम्यान किमान एक वर्ष कोणत्याही सहकारी संस्थेच्या व्यवस्थापक कमेटीवर संचालक राहिल्याचा दाखला अनावधनाने न जोडल्याने त्यांचे नामनिर्देशन पत्र नामंजूर करण्यात आले होते. या निर्णयाविरोधात आगाशे यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५२ अ अन्वये अपील दाखल केले होते. अपील सुनावणी दरम्यान आगाशे यांनी आवश्यक कागदपत्रे सादर केली. त्यामुळे अपील अधिकाऱ्यांनी अटींची पूर्तता झाल्याचे नमूद केले. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक प्रवीण वानखेडे यांनी दिलेल्या आदेशानुसार आगाशे यांचे अपील मान्य करण्यात आले असून त्यांचे नामनिर्देशन पत्र वैध ठरविण्यात आले आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा दिनांक ३० जून रोजीचा नामंजुरीचा आदेश रद्द करण्यात आला आहे. शीला आगाशे यांचे नाव यादीत समावेश करण्यात यावा, असे निर्देश देण्यात आले आहेत.

# पहिल्याच पावसात वाहून गेला पारडीचा रस्ता

### दुरुस्तीसाठी पहावी लागणार वाट

**लोकशाही वार्ता/मोहाडी**

पारडी ते भुराजी देव या रस्त्यावरील निमार्णाधिन पुलाचे बांधकाम व रस्ता पहिल्याच पावसात वाहून गेला. रस्त्याला खिंडार पडले. त्यामुळे मोहाडीला जाणाऱ्या रस्त्याची वाहतूक खोळंबली आहे.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत पारडी ते खोडगाव रस्ता बांधकाम करण्यात येत आहे. पारडी-भुराजी देव या रस्त्यावर कंत्रादारांनी ४४२.८६ लाख रुपयांच्या पुलाचे बांधकाम सुरू केले आहे. तथापि पहिल्याच पावसात पुलाचे निकृष्ठ काम पावसाने उघडकीस आणले. त्या रस्त्याचे दोन भाग पडले आहेत. त्यामुळे त्या ओढ्याला पाणी ओसंडून वाहत आहे. मोहाडीकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे थांबली आहे. तीन महिन्यापूर्वी या पुलाचे बांधकाम सुरू करण्यात आले होते. बांधकाम सुरू करताना पुलाच्या बाजूने पर्यायी रस्ता काढलेला नाही.



बांधकामाच्या रस्त्यावरच तात्पुरता उभारलेला पुल पावसात वाहून गेला आहे. पारडीवासियांना मोहाडीकडे जाण्यासाठी पर्यायी मार्ग आहेत, परंतु नेहमीच्या मार्गाने जाण्याचा खोळंबा झाला आहे, पारडीच्या गावकऱ्यांना दोन किलोमीटर अंतर कापत दहेगावमार्गे मोहाडीला जावे लागते. चौंडेश्वरी देवीच्या रस्त्याच्या मार्गाने पारडीवासियांना मोहाडी गाठावी लागत आहे. पुलाचे काम अर्धवट सोडण्यात आले आहे. चुकीचे काम होत असतांनाही कंत्राटदार कोणाचेही एकत नाही, असा आरोप ग्रा. पं. सदस्य राजेश निंबार्ते, संजू बोंद्रे यांनी केला आहे.

आवश्यक नसलेल्या ठिकाणी पुलाचे बांधकाम होत आहे. नाल्याची दिशा एकीकडे व पुलाचे बांधकाम दुसरीकडे होत आहे. पर्यायी रस्ता न देता वाहतूक विस्कळित करण्यात आली. पुलाचे काम नियमानुसार होत नसल्याचा आरोप पारडीच्या सरपंचा शारदा गाढवे यांनी केला आहे.

# ई-केवायसी न केल्यास धान्य मिळणे होणार बंद

### तात्काळ ई-केवायसी करण्याचे आवाहन

**लोकशाही वार्ता/तुमसर**

सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत शिधापत्रिकाधारकांना अनुदानित दरात धान्य वितरित केले जाते. मात्र, आता ई- केवायसी न केलेल्या शिधापत्रिकाधारकांना धान्य मिळणे बंद होणार असल्याचे अन्न व नागरी पुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे.

तुमसर तालुक्यातील सरकारी स्वस्त धान्य दुकानातून अन्नधान्याचा लाभ घेणाऱ्या शिधापत्रिका धारकांना रेशन दुकानात ई- केवायसी प्रक्रिया करणे अनिवार्य होते. याकरिता पुरवठा विभागाद्वारे वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे. अद्याप १५२७५५ नागरिकांची ई-केवायसी पूर्ण झाली असून ४०८४३ लाभार्थ्यांची ई-केवायसी पूर्ण होणे बाकी आहेत. त्यामुळे त्यांना धान्यापासून वंचित रहावे लागणार आहे. ज्या लाभार्थ्यांनी केवायसी केली नसेल त्यांनी तत्काळ केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन तुमसर तहसील कार्यालयाचे अन्न निरीक्षण अधिकारी प्रशांत अंबुलकर यांनी केले आहे.

लाभार्थ्यांनी आपल्या स्वस्त धान्य दुकानामधून ई-केवायसी करून घ्यावी. तसेच जे लाभार्थी गाव सोडून कामानिमित्त बाहेरगावी गेलेले आहेत, त्यांनी तेथील स्वस्त धान्य दुकानामधून किंवा आपल्या मोबाइलमध्ये 'मेरा ई-केवायसी ॲप' डाऊनलोड करून त्यामधून केवायसी पूर्ण करावी असेही त्यांनी सांगितले आहे.

# संघटनेतच शक्ती आहे - राज्यपाल बागडे

### माजी आमदार डॉ. हेमकृष्ण कापगते यांचा सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा

**लोकशाही वार्ता/साकोली**

संघाची शिकवण आयुष्यभर विसरता कामा नये. आणीबाणीच्या काळात ज्यांनी काम केले ते विसरू शकत नाहीत. संघाकडून आपल्याला ऊर्जा आणि शक्ती मिळाली आहे. संघटनेतच शक्ती आहे. लहानपणापासूनच संघाकडून समाज आणि देशासाठी काम करण्याची इच्छाशक्ती मिळाली आहे. राष्ट्र आणि हिंदुत्वाला बळकटी देणे आपल्यासाठी आवश्यक आहे. त्याग आणि तपश्चर्येमुळेच आपण हे दिवस पाहू शकलो, असे प्रतिपादन राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी केले.

साकोली येथील नागझिरा मार्गावरील भारत सभागृहात माजी आमदार डॉ. हेमकृष्ण कापगते यांच्या सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.



यावेळी माजी आमदार डॉ. हेमकृष्ण कापगते, खासदार डॉ. प्रशांत पडोळे, आमदार डॉ.परिणय फुके, माजी खासदार सुनील मेंढे, माजी आमदार वसंत भोंडे, माजी खासदार मधुकर कुकडे, अविनाश ब्राह्मणकर, किशोर चौधरी, रेखा भाजीपाले, शिवराम गिऱ्हेपुंजे, श्याम गव्हारे उपस्थित होते.

यावेळी सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या ८० मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. माजी आमदार डॉ. हेमकृष्ण कापगते यांनी लिहिलेल्या 'जन प्रवाही' या पुस्तकाचे अनावरण करण्यात आले.

प्रतिष्ठाणचे सचिव राजू दूबे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना मांडली. खासदार डॉ. प्रशांत पडोळे, माजी आमदार परिणय फुके, माजी खासदार सुनील मेंढे यांनीही माजी आमदार डॉ. हेमकृष्ण कापगते यांचे सरपंच, आमदार म्हणून काम, संघाचे कार्य आणि डॉक्टर असताना आयोजित शिबिरे तसेच त्यांच्या जीवनावरील प्रसंगावर प्रकाश टाकला. कार्यक्रमासाठी ॲड. मनीष कापगते, दिनेश कापगते, व्यंकटेश येवले, तथा सहस्त्रचंद्रदर्शन समितीचे पदाधिकारी व सदस्यांनी प्रयत्न केले.

## ५ कारवायांत ३४ हजारांचा मुद्देमाल जप्त

**भंडारा :** जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीत अवैध धंद्यांविरोधात मोहीम राबवून पोलिसांनी कारवाई केली. यामध्ये जुगार व अवैध दारू अड्ड्यांवर धाड टाकून एकूण ३४ हजार ८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. साकोली पोलिसांनी ग्यानिराम तुकाराम टोंगडे (४२), अतुल टेंभुर्णे (३६), रा. लवारी, ता. साकोली यांच्याजवळून सट्टा पट्टी, मोबाईल व १२४० रुपये रोख असा एकूण १३ हजार २५० रुपयाचा मुद्देमाल, कारधा पोलिसांनी दशरथ ठवकर (४०) रा. मानेगाव याच्याजवळून २ हजार रुपयाची दारू, करडी पोलिसांनी सुभाष बाबुराव मेश्राम (५२), रा. आंबेडकर वार्ड, मुंढरी (बु), ता. मोहाडी याच्याजवळून ४ हजार रुपयाची दारू, गोबरवाही पोलिसांनी आशिष दामाजी मारबते (३२), रा. सितासावंगी याच्याजवळून १३०० रुपयाची दारू, अड्याळ पोलिसांनी परमानंद नंदागवळी (६०) रा. सोनेगाव बुटी, ता. पवनी याच्याजवळून देशीदारुचा साठा जप्त केला आहे.

# देव्हाडी वळणावर भीषण अपघात, दुचाकीस्वार गंभीर जखमी

**लोकशाही वार्ता/ तुमसर**

देव्हाडी मार्गावर दि. १३ जुलै रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास भरधाव ट्रॅक्टरचे स्टिअरिंग लॉक झाल्याने ते थेट रस्त्याकडेला असलेल्या दिलीप वाघमारे यांच्या दुकानात शिरले. या अपघातात दुकानासमोर उभ्या असलेल्या दुचाकीस्वाराला चिरडले.

भरधाव ट्रॅक्टर अनियंत्रित होताच त्याने रस्त्याच्या कडेला उभ्या एमएच ३१ एन ८६८५ क्रमांकाच्या दुचाकीवर असलेल्या लक्ष्मण हलमारे याला चिरडले, आणि पुढे जाऊन दुकानातील गाडी (एमएच ३६ एडी ४१३४) आणि दुकानाचे मोठे नुकसान केले. अपघात इतका भीषण होता की दुचाकी व दुकानातील गाडी अक्षरशः चुरडून गेल्या.

अपघातात ट्रॅक्टर चालक सुमित उर्फ श्रावण शंकर भिवगडे (२८, रा. तुडका) हा देखील गंभीर



जखमी झाला. जमावाने तातडीने दोघांनाही उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर दोघांनाही भंडारा येथे हलविण्यात आले. लक्ष्मणच्या डोक्याला, नाकाला व ओठाला गंभीर दुखापत झाली असून तो अद्यापही बेशुद्ध आहे. सुमितच्या कपाळ व चेहऱ्यावर गंभीर घाव असून त्याचीही प्रकृती चिंताजनक आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ट्रॅक्टर चालक सुमित भिवगडे हा आपल्या गावातील देशमुख यांचे ट्रॅक्टर घेऊन शेतीची कामे आटपून गोंदिया मार्गे देव्हाडी जात होता. दरम्यान, वळणावर ट्रॅक्टरचे स्टिअरिंग अचानक लॉक झाले, आणि अपघात घडला. तुमसर पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून ट्रॅक्टर व दुचाकी ताब्यात घेतली असून चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, दोघांवर उपचार सुरू असल्यामुळे अधिकृत तपशील अद्याप उपलब्ध झालेला नाही.

# लाखनी पोलिस ठाण्यात नाही महिला प्रसाधनगृह

### प्रसाधनगृहासाठी ठाणेदारांना निवेदन

**लोकशाही वार्ता/लाखनी**

येथील पोलिस ठाण्यात महिला प्रसाधनगृह नसल्याने फिर्याद देण्यासाठी येणाऱ्या महिला आणि महिला कर्मचाऱ्यांची कुचंबना होत आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ता अश्विनी दिलीप भिवगडे यांनी पोलिस निरीक्षकांना निवेदन देऊन महिला प्रसाधनगृहाची व्यवस्था करण्याची मागणी केली आहे.

सध्या नवीन लाखनी पोलिस स्टेशनचे बांधकाम सुरू आहे. येथील पुरुषांचे स्वच्छतागृह अतिशय घाणेरडे व अस्वच्छ आहे. त्यामुळे महिलांना मुत्रीघराची व स्वच्छतागृहाची अडचण होत आहे. लाखनी पोलिस स्टेशनमध्ये



साधारण १६ ते १७ महिला पोलिस कर्मचारी कार्यरत असून त्यांना सुद्धा या अडचणीचा व समस्येचा सामना करावा लागत आहे.

लाखनी पोलिस स्टेशनचे कार्यक्षेत्र मोठे आहे. त्यामुळे परिसरातील अनेक ग्रामीण व शहरी महिला, शासकीय, सेवेत कार्यरत असलेल्या महिला व मुली यांना विविध कामांसाठी पोलिस ठाण्यात यावे लागते. अशावेळी महिलांना मुत्रीघर, स्वच्छतागृहाची कमतरता असल्यामुळे असुरक्षिततेचा सामना करावा लागतो.

महिलांची प्राथमिक गरज म्हणून तात्काळ दोन दिवसात महिलांकरिता सुरक्षित स्वच्छतागृहाची बांधणी करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. अन्यथा पोलिस स्टेशन लाखनीसमोर क्रांतीज्योती महिला संघटनच्या वतीने ठिय्या आंदोलन व निदर्शने करण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्त्या तथा क्रांतीज्योती महिला संघटन लाखनीच्या अध्यक्षा अश्विनी भिवगडे यांनी निवेदनातून दिला आहे.

# जोगी तलाव सौंदर्यीकरणाची पोलखोल

**लोकशाही वार्ता/भंडारा**

शहराच्या मध्यभागी असलेल्या जोगी तलाव परिसरात करण्यात आलेल्या सौंदर्यीकरण कामाची गुणवत्ता पहिल्याच पावसात उघड झाली आहे. अर्धवट व निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे आता हा परिसर नागरिक आणि भटक्या जनावरांसाठी धोकादायक बनत चालला आहे.

तलावाच्या चारही बाजूंनी बसवलेले स्लॅब्स पावसामुळे ढासळू लागले असून, तलावाच्या काठाने चालणेही जीवघेणे ठरत आहे. अनेक ठिकाणी माती खचली आहे तसेच बांधकाम साहित्य पाण्यात वाहून गेले आहे. यामुळे केवळ परिसराची हानी झाली नाही, तर तेथे येणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेवरही प्रश्नचिन्ह निर्माण



झाले आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे तक्रार करत दोषी कंत्राटदारावर कठोर कारवाईची मागणी केली आहे. प्रशासकीय दुर्लक्ष आणि कंत्राटदाराची मनमानी यामुळे जोगी तलावाचे हे सौंदर्यीकरण निष्प्रभ आणि धोकादायक ठरत आहे.

## १५ जुलैपासून पुन्हा सुरू होणार डीईएमयू ट्रेन

**भंडारा :** गेल्या १५ महिन्यांपासून बंद असलेली तुमसर रोड - बालाघाट डीईएमयू ट्रेन सेवा १५ जुलै



पासून पुन्हा सुरू होत आहे. दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, बिलासपूरच्या प्रिन्सिपल चिफ ऑपरेटिंग मॅनेजर यांनी याबाबत अधिकृत घोषणा केली आहे. ही ट्रेन तुमसर रोडवरून तुमसर टाऊन, गोबरवाही, तिरोडी, कटंगी व वारासिवनीमार्गे बालाघाटपर्यंत जाईल. परतीच्या मार्गात ती बालाघाटहून तिरोडी, गोबरवाही मार्गे तुमसररोड येथे येईल. या सेवेला पुन्हा सुरुवात होणार असल्याने तुमसर, गोबरवाही, डोंगरी बुजुर्ग परिसरातील नागरिकांत आनंदाचे वातावरण आहे.

लोकशाही वार्ता
# गोंदिया
नागपूर, सोमवार, १४ जुलै २०२५ / ११

लोकशाही वार्ता
जिल्हा कार्यालय, गोंदिया
जिल्हा प्रतिनिधी : जयंत शुक्ला
पत्ता : दुसरा माळा, गौरक्षण मार्केट गोंदिया
संपर्क क्र ९८२२३८६९९९

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

गुड मॉर्निंग

### ब्लेडने मारून केले जखमी

**लोकशाही वार्ता / गोंदिया**
रावणवाडी पोलिस ठाण्यातंर्गत तीन आरोपींनी संगनमत करून फिर्यादीला ब्लेडने मारून जखमी केले. ही घटना १२ जुलै रोजीची आहे. फिर्यादी लालदिप नंदकिशोर ढोके (२५) रा.बलमाटोला हा नास्ता करण्यासाठी हॉटेलमध्ये गेला होता. त्या ठिकाणी तीन आरोपींनी येवून वाद निर्माण केला. तसेच ब्लेडने मारून जखमी केले. तक्रारीवरून रावणवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# गोंदियात पडला नुकसान न करणारा पाऊस!

## कृषी विभाग म्हणतो २ हेक्टरचेच नुकसान
## आतापर्यंत सरासरीच्या १२०.३ टक्के पाऊस



**लोकशाही वार्ता / गोंदिया**
जिल्ह्यात ७, ८ व ९ जुलै रोजी पावसाने थैमान घातले. शेकडो, घरे, गोठ्यांचे नुकसान झाले. अतिवृष्टिने झाडे उल्मडून पडल्याने तिघांचा जीव गेला. नदी, नाले काठावरील शेकडो एकर शेती पाण्याखाली आली. असे असताना कृषी विभाग म्हणतो २ हेक्टरातीलच पिकाचे नुकसान अन् तेही सडक अर्जुनी तालुक्यात दुसरीकडे लागवड केलेले धान व नर्सरीचे नुकसान झाल्याचे शेतकरी सांगताहेत. मात्र, अद्यापही कृषी विभागाने प्रत्येक्ष पाहणी केली नसल्याची माहिती आहे.

यंदा हवामान विभागाचा अंदाज चुकला. अंदाजानुसार आडवडाभरापूर्वी येणाऱ्या मान्सूनचे आगमन लांबले. परिणामी पेरण्या लांबल्या. जिल्ह्यात २७ जूनपासून मोसमी पावसाने हजेरी लावली. ५ जुलैपासून जिल्ह्यात सार्वत्रिक पाऊस सुरू झाला. ६ जुलै रोजी रात्रीपासून पावसाचा जोर वाढला.

७ रोजी गोंदिया व तिरोडा तालुक्यात अनुक्रमे ६४.४, ७२.९ मिमी पाऊस झाला. यानंतर जिल्ह्यातील अनेक भागांत पावसाचा जोर कायम राहिला. ८ जुलै रोजी यंदाच्या हंगामातील विक्रमी ११६.४ मिमी पाऊस बरसला. या दिवसी सर्वाधिक २२६.५ मिमी पाऊस देवरी तालुक्यात तर अर्जुनी मोर २०६.९, तिरोडा १२०, गोंदिया १०४.५, सालेकसा ७५.७ आणि सडक अर्जुनी तालुक्यात ७४ मिमी पाऊसाची नोंद झाली. ४१ मंडळांपैकी ३१ मंडळात अतिवृष्टीची नोंद करण्यात आली. ९ जुलै रोजी देवरी १०४.५ मिमी, सडक अर्जुनी १२०.६, अर्जुनी मोर ८९.६ मिमी असा जिल्ह्यात सरासरी १६६.६ मिमी पाऊस कोसळला. तीन दिवसाच्या पावसाने २६८ घरांचे अंशतः, ७ घरे पूर्णतः धराशाही झाले. ८४ गोठ्यांना फटका बसला. अतिवृष्टिने झाडे पडून तीनजण मृत्यूमुखी तर तिघे जखमी झाले. नदी, नाले काठावरील शेकडो एकर शेती पाण्याखाली आली.

चार दिवस पावसाचे पाणी शेतात साचून राहिल्याने लागवड केलेले धान व कोवळ्या धान नसऱ्याचे नुकसान झाल्याचे शेतकरी सांगताहेत. असे असताना कृषी विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी शेतीची प्रत्यक्ष पाहणी करण्याचे सौजन्य दाखविले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये यंत्रणेविरोधात संताप व्यक्त केला जात आहे. सलग तीन दिवस अतिवृष्टी होऊनही कृषी विभाग म्हणतो नुकसान नाही. हे आश्चर्यच म्हणावे लागेल.

जुलैमध्ये १२ दिवसांत ३११.८ मिमी म्हणजेच सरासरीच्या १९४.१ टक्के पाऊस कोसळला. तर जूनमध्ये सरासरीच्या केवळ ११३.३ मिमी म्हणजे ५८. ८ टक्केच पाऊस बरसला. १ जून ते १२ जुलैपर्यंत ३५३.४ मिमी पाऊस अपेक्षित असताना या काळात सरासरी ४२५.१ मिमी ज्याची टक्केवारी १२०.३ आहे. १२ जुलैपर्यंतच्या तालुकानिहाय पावसाच्या टक्केवारीवर नजर टाकल्यास गोदिया ११०.४ टक्के, आमगाव ८२, तिरोडा १०६, गोरेगाव ११८.४, सालेकसा ९८.५, देवरी १५२.१, अर्जुनी मोर १३४.१ आणि सडक अर्जुनी तालुक्यात ९१.८ टक्के पर्जन्यवृष्टी झाली आहे.

**प्राथमिक माहितीनुसार, सध्या तरी मोठे नुकसान झालेले नाही. पंचनामे झाल्यावरच नुकसानीचा अंदाज येईल. सडक अर्जुनी तालुक्यात २ हेक्टर क्षेत्रातील पपई व भाजीपाला पिकाचे नुकसान झाले आहे.**

**- नीलेश कानवडे**
**जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, गोंदिया.**

# गोंदियावासीयांना गढूळ पाण्याचा ताप

## अस्वच्छतेचाही कळस, जलजन्य आजारांना आमंत्रण



**लोकशाही वार्ता / गोंदिया**
शहरात गेल्या काही महिन्यापासून नळाद्वारे होणारा दुषीत पाणीपुरवठा व शहरातील अस्वच्छतेने नागरिकांचा ताप वाढला आहे. याविरोधात नागरिकांमध्ये रोष व्यक्त होत असला तरी जीवन प्राधिकरण व नगर परिषद प्रशासन उदासीन असल्याचे चित्र आहे. त्यामुळे जलजन्य व कीटकजन्य आजारांना आमंत्रण मिळत आहे. पावसाळ्यात साथरोगांचा प्रादुर्भाव टाळता यावा, यासाठी प्रशासनातर्फे पावसाळापूर्व कामे तसेच नळ योजनेच्या कामांची नियमीत देखभाल करणे अपेक्षित असतात. परंतु ही कामे थातूरमातूर होत असल्याने दरवर्षी शहरवासीयांना जलजन्य व कीटकजन्य आजारांचा सामना करावा लागतो. यंदाही तिच स्थिती पहायला मिळत आहे.

शहराला डांगोर्ली येथून पिण्याच्या पुरवठा करण्यात येतो. जीवन प्राधिकरणातर्फे शहरातील १९ हजार नळधारकांना दररोज १ कोटी ४० लाख लीटर पाण्याचा पुरवठा केला जातो. परंतु शहरातील पाणीपुरवठा योजना नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत राहते. कधी खंडीत वीजपुरवठा, कधी तांत्रिक कारण तर कधी विकास कामांसाठी खोदकामामुळे पाईपलाईनला होणाऱ्या लिकेजमुळे शहरवासीयांना खंडीत पाणीपुरवठा व गढूळ पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागते. गेल्या काही दिवसापासून पुन्हा या समस्येचा सामना शहरवासींना करावा लागत आहे. गढूळ पाणीपुरवठ्यामुळे शहरात जलजन्य आजाराचा धोका वाढू लागला आहे. त्याचत शहरातील अस्वच्छतेचा विषयही गंभीर होत चालला आहे.

शहरात घंटागाडींच्या माध्यमातून घराघरातील कचरा गोळा केला जात असला तरी सार्वजनिक ठिकाणी व रस्त्येच्या कडेला साचलेले कचऱ्याचे ढिग आणि तुंबलेल्या नाल्यांमुळे कीटकांचा प्रादुर्भाव झाला असून नागरिकांना कीटकजन्य आजारांचाही सामना करावा लागत आहे. याविरोधात नागरिकांमध्ये रोष व्यक्त होत असला तरी जीवन प्राधिकरण व नगर परिषद प्रशासन उदासिन असल्याचे दिसत आहे.

## दृष्टिक्षेप

### अनोळखी इसम मृतावस्थेत आढळला

**गोंदिया** : गोंदिया-रायपूर लोहमार्गावर गुदमा शिवारात एक अनोळखी इसम लोहमार्गाजवळ मृतावस्थेत आढळला. ही घटना १२ जुलै रोजीची सकाळी ७:३० सुमारासची आहे. गुदमा डीएन लाईनजवळ एक इसम पडून दिसून आला. यावर त्याला रूग्णालयात नेले असता वैद्यकीय अधिकाऱ्याने मृत घोषित केले. तक्रारीवरून रामनगर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### काठीने मारून केले जखमी

**गोंदिया** : अर्जुनी मोरगाव पोलिस स्टेशनतंर्गत अरततोंडी येथे शेत कामासाठी ट्रॅक्टरने जात असलेल्या फिर्यादी शिवीगाळ करून काठीने मारून जखमी केले. ही घटना १२ जुलैच्या सकाळी ९.०० वाजता सुमारासची आहे. फिर्यादी सुर्यभान देवराम मुनेश्वर (४८)) रा.अरततोंडी हे आपल्या पुतण्यासोबत शेतात जात होते. दरम्यान, रस्त्यावर ठेवलेले नांगर बाजूला करण्यासाठी त्याचा पुतण्या गेला असता आरोपी विलास पांडू मुनेश्वर (५५) रा.अरततोंडी याने शिवीगाळ करून काठीने मारून जखमी केले. तक्रारीवरून अर्जुनी मोरगाव पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### ट्रॅकची चारचाकी वाहनाला धडक

**गोंदिया** : नागपूरवरून गोंदियाकडे जात असलेल्या चारचाकी वाहनाला आरोपी ट्रक चालकाने लापरवाहीने चालवून धडक दिली. या घटनेत कार चालक जखमी झाले असून वाहनाचे नुकसान झाले. या प्रकरणी तिरोडा पोलिस ठाण्यात १२ जुलै रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. फिर्यादी तृशाल श्रावण कापसे (४९) रा.रमाईनगर नागपूर हा कुटूंबियासह वाहन क्र.एमएच-४९/बीबी-९७९४ ने नागपूरवरून गोंदियाकडे येत होता. दरम्यान रामटेक-तुमसर-खापा मार्गे भरधाव ट्रक क्र.एमएच-३१/सिक्यु-८५७३ गोंदियाकडे जात होता. ट्रकच्या चालकाने लापरवाहीने चालवून चारचाकी वाहनाला धडक दिली. या घटनेत वाहनात बसलेले फिर्यादीचे कुटूंबातील सदस्य जखमी झाले असून वाहनाचे नुकसान झाले आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून तिरोडा पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

### रेल्वे स्थानकावर पकडला २५ हजारांचा गुटखा

**गोंदिया** : रेल्वे सुरक्षा बलाच्या नागपूर मंडळ टास्क टीमने गोंदिया रेल्वेस्थानकाच्या परिसरातून प्रतिबंधित पानमसाला व सुगंधित तंबाखूसह एकाला ताब्यात घेतले. या कारवाईत छत्तीसगडहून महाराष्ट्रात आणलेला २५ हजार रुपयांचा गुटखा आणि तंबाखू जप्त करण्यात आला. ही कारवाई ९ जुलै रोजी करण्यात आली. या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे. मंडळ सुरक्षा आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली, ९ जुलै रोजी सायंकाळी ७:३० वाजण्याच्या सुमारास, सहायक उपनिरीक्षक के. के. निकोडे, उपनिरीक्षक के. के. दुबे, सी. के. पी. टेंभुर्णीकर व त्यांचे सहकारी कर्मचारी गस्त घालत असताना गोंदिया रेल्वे स्थानकाबाहेर एफ. ओ. बी. परिसरात एका व्यक्तीला दोन मोठ्या काळ्या पिशव्यांसह संशयास्पद हालचाली करताना पाहिले. त्याला ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली असता त्याने आपले नाव धनकुमार गुलाबचंद जैन (५५), रा. बाजार चौक, रामनगर, गोंदिया असे सांगितले. सुरुवातीला त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली; त्यामुळे त्याच्याजवळ असलेल्या पिशव्यांची तपासणी केली असता त्यात महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला पानमसाला आणि सुगंधित तंबाखू आढळून आला. आरोपीला गोंदिया शहर पोलिस ठाण्याकडे सुपूर्द करण्यात आले.

# खड्डयातील पाण्यात बुडून चिमुकल्याचा मृत्यू

**गोंदिया** : तालुक्यातील माकडी येथे शेळ्या चारण्यासाठी मुलांसोबत शेतात गेलेल्या ४ वर्षीय मुलाचा खड्डयातील पाण्यात बुडून मृत्यू झाला. ही घटना ११ जुलै रोजीची आहे. नीत राजकुमार सोनवाने (०४) रा. माकडी असे मृत चिमुकल्याचे नाव आहे. या प्रकरणाची रावणवाडी पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

सविस्तर असे की, रावणवाडी पोलिस ठाण्यांतर्गत ग्राम माकडी येथे ११ जुलै रोजी नेहमीप्रमाणे नीत सोनवाने (०४) हा शेजारच्या मित्रांसोबत शेळ्या चारण्यासाठी शेताकडे गेला होता. दरम्यान शेतशिवारात मुरूम खोदकाम केल्याने खड्डे निर्माण झाले होते. या खड्डयात पावसाचे पाणी साचल्याने तलावाचे स्वरूप आले आहे. अशात शेळ्या चारत असताना नीत खड्डयात पडला. या घटनेत त्याचा मृत्यू झाला. उल्लेखनिय असे की, नीतच्या आईचे दोन वर्षापूर्वी निधन झाले असून वडील हैद्राबाद येथे मजुरीसाठी गेले आहेत. त्यामुळे नीत आपल्या आजीकडे राहत होता. या घटनेची माहिती मिळताच रावणवाडी पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. तसेच घटनेची नोंद रावणवाडी पोलिस ठाण्यात केली आहे. या घटनेने माकडी गावात शोककळा निर्माण झाली आहे.

# मुरमाच्या खाणीत पडून बालकाचा मृत्यू



**लोकशाही वार्ता / गोंदिया**
मुरूमाच्या खाणीत पडून एका बालकाचा मृत्यू झाल्याची घटना तालुक्यातील माकडी-काटी जंगल परिसरात ११ जुलै रोजी संध्याकाळच्या सुमारास उघडकीस आली. नीत राजकुमार सोनोने (४) रा. माकडी असे मृताचे नाव आहे. नीत हा त्याच्या चुलत भावासह माकडी-काटी मार्गावरील जंगल परिसरात शेळ्या चारण्यासाठी गेला होता.

दरम्यान तो परिसरातील मुरमाच्या खाणीकडे गेला. यावेळी त्याचा तोल गेल्याने तो खाणीत पडला. यातच त्याचा पाण्यात उडून मृत्यू झाला. नीत पाण्यात पडल्याची माहिती त्याच्या चुलत भावाने कुटुंबीयांना दिली. पोलिसांनाही याबाबतची माहिती मिळाली. त्यामुळे घटनास्थळी मोठी गर्दी झाली. नीतला पाण्याबाहेर काढले असता, त्याचा मृत्यू झाल्याचे लक्षात आले. या प्रकरणी रावणवाडी पोलिसांनी मर्ग दाखल केला आहे.

# रेल्वेने कटून इसमाचा मृत्यू

**गोंदिया** : डुग्गीपार पोलिस ठाण्यात अतंर्गत गणखैरा रेल्वे स्टेशन परिसरात रेल्वेने कटून इसमाचा मृत्यू झाला. ही घटना ६ जुलै रोजीची आहे. गणखैरा रेल्वे परिसरातील १० किमी दक्षिण येथे एक अनोळखी इसम पॅसेंजर ट्रेनखाली आल्याने कपून मरण पावला. फिर्यादी प्रमोदकुमार महावार याच्या तक्रारीवरून गुन्हा नोंद केला आहे.

# टी.एस.येळेकर यांचा सेवानिवृत्ती सत्कार



**लोकशाही वार्ता / सडक/अर्जुनी**
फुलीचंदजी भगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कोसमतोंडी येथे १ जुलै रोजी, मंगळवारच्या दिवशी, टी.एस. येळेकर यांच्या सेवानिवृत्ती निमित्त सत्कार समारंभ अत्यंत स्नेहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

शाळेतील आपल्या तीस वर्षांच्या अविरत, निःस्वार्थी आणि निष्ठावान सेवेद्वारे विद्यार्थ्यांचे आयुष्य घडविणाऱ्या, पालकांचा विश्वास जिंकणाऱ्या आणि समाजाशी समरस होऊन कार्य करणाऱ्या येळेकर यांचा सर्व विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी, कर्मचाऱ्यांनी व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष सत्कार करून त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

या कार्यक्रमाला संस्थेच्या सचिव सौ. रीता देवी येळे, अध्यक्ष उमेश कठाणे, सौ. कठाणे, सदस्य ताराचंद अंबुले, हितेश येळे, नुकूल चौधरी, गिरीश चौधरी, महेन पारधी, तसेच मुख्याध्यापक सर्व शिक्षकवृंद व इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी येळेकर यांचा वाढदिवस केक कापून साजरा करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांसह सर्व उपस्थितांनी स्नेहभोजनाचा आनंद घेत कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# विनापरवाना रासायनिक खत घेऊन जाणारे वाहन पकडले

## तीन मालवाहक जप्त; ४५ हजारांचा माल जप्त



**लोकशाही वार्ता / आमगाव**
विना परवाना खत वाहतूक करणाऱ्या परप्रांतीय शेतकऱ्यांच्या तीन वाहनांवर कारवाई करून ४५ पोती खताचा साठा जप्त करण्यात आला. ही कारवाई १२ जुलै रोजी सायंकाळी कृषी विभागाच्या भरारी पथकाने केली असून अवैधरित्या खत विक्रीचा सुरू असलेला गोरखधंदा उजागर केला आहे. तीन मालवाहक जप्त करून वाहन चालकांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

आमगाव शहराला लागूनच छत्तीसगड व मध्य प्रदेशची सीमा आहे. व या परिसरातील नागरिक शेतीवर अवलंबून आहेत. खरीप हंगामाला सुरूवात झाली असून बहुसंख्य शिवारात धान पिकांचा पेरा सर्वाधिक दिसून येत आहे. पिकांना उभारी घेण्यासाठी विविध रायायनिक घटकांचा समावेश असलेल्या खतांची गरज असल्यामुळे शेतकरी कृषी केंद्रात रासायनिक खते खरेदीसाठी गर्दी करून आहेत. परंतु काही कृषी केंद्र लालसेपोटी परप्रांतीय शेतकऱ्यांना विनापरवाना खत विक्री करीत असल्याचे शहरात आढळून आले आहेत. १२ जुलै शनिवारला सायंकाळी ५ वाजे दरम्यान परप्रांतीय शेतकरी रासायनिक खते परराज्यात घेऊन जात असताना कृषी विभागाला माहिती मिळताच कृषी विभागाच्या भरारी पथकाने कारवाई करून तीन वाहन जप्ती केले आहेत. या कारवाईत ४५ हजार रुपये किमतीचा ४५ पोती रासायनिक खत जप्त करण्यात आला आहे. वाहन क्रं एमएच-३५/एजे-४३६२, एमएच- ३५/ एजे -३५२९, एमएच-३१/डीएस-२५९७ वाहन चालक शैलेंद्र दमाहे रा.घंसा, शुभम येडे रा.पाथरगाव, विनोद कोघुटे, रा.बिंजली या गाडी चालकांवर रासायनिक खत नियंत्रण आदेश १९८५ (४) (ब) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

### त्या दुकानदारांवर कारवाई होणार काय?

**कृषी विभागाकडून खतविक्रेत्यांना अटी-शर्ती व नियमानुसारच खत विक्री करावे, अशी तंबी दिली आहे. परंतु, विभागाच्या सुचनांकडे दुर्लक्ष करून माया जमविण्याच्या नादात खतविक्रीचा गोरखधंदा सुरू आहे. आमगाव तालुका जवळ असल्यामुळे मध्यप्रदेश व छत्तीसगढ येथील शेतकरी आमगाव शहरातून विनापरवाना खत खरेदी करून नेत असल्याची चर्चा नेहमीच ऐकायला मिळत असे. परंतु, कृषी विभागाची कारवाई मात्र शून्य असल्याचे वृत्ताला दुजोरा मिळाला नाही. त्यातच मागील काही वर्षांपासून हा गोरखधंदा चांगलाच सुरू होता. त्यातच पहिल्यादांच कृषी विभागाने कारवाई करून खतविक्रीचा काळाबाजार उजागर केला आहे. त्यामुळे त्या शेतकऱ्यांना खत पुरविणाऱ्या त्या दुकानदारांवर कारवाई होणार का? याकडे तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.**

### शिवीगाळ करून मारहाण

**गोंदिया** : तिरोडा पोलिस स्टेशन अंतर्गत सुकडी फाटा येथे आरोपीने संगनमत करून ट्रॅक्टर चालकाला शिवीगाळ करून जबर मारहाण केली. ही घटना ११ जुलैच्या रात्री ९:१५ वाजता सुमारासची आहे. फिर्यादी परसराम कन्हैयालाल लिल्हारे (३६) रा.गुरूदेव वॉर्ड तिरोडा हा ट्रॅक्टरमध्ये मुरूम भरून लोधीटोलाकडे जात होता. दरम्यान सुकडी फाटा येथे आरोपी भरत शंकर चव्हाण (५०) रा.लक्ष्मीनगर तिरोडा याने त्याला आवाज देवून वाद निर्माण केला. तसेच शिवीगाळ करून इतर मित्रांसोबत जबर मारहाण केली. तिरोडा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# डव्वा नाल्यावरील पूल झाला धोकादायक



### प्रशासन, लोकप्रतिनिधी केव्हा होणार गंभीर

**या मार्गावरील हा धोकादायक पूल पाडून त्या ठिकाणी नवीन पूल तयार करण्याची मागणी अनेकदा प्रशासन व लोकप्रतिनिधींकडे करण्यात आली. पण, त्यांनी अद्यापही याची दखल घेतली नाही. परिणामी पुलाची समस्या आणि धोका कायम आहे. या पुलाच्या दोन्ही बाजूला वाढलेली झुडपी साफ करण्याची गरज आहे.**

**लोकशाही वार्ता / सडक/अर्जुनी**
कोहमारा-गोंदिया मार्गावरील डव्वा गावाजवळ अरुंद पूल असून या पुलावरील कठडेही तुटलेले आहेत. परिणामी, हा पूल ये-जा करणाऱ्यांसाठी धोकादायक ठरत आहे. संबंधित विभागाने याची दखल घेऊन त्वरित पुलाची दुरुस्ती करण्याची गरज आहे. अन्यथा मोठा अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**पुलावरील कठडेही तुटलेले ; त्वरित दुरुस्तीची गरज**

अरुंद असलेल्या या पुलाची उंची कमी आहे. सोबतच एका बाजूचे कठडेदेखील तुटलेले आहेत. या पुलाच्या दोन्हीही बाजूने झाडेझुडपे वाढली असल्याने वाहन चालकांना तसेच जाणाऱ्या-येणाऱ्यांना पूल दिसत नाही. परिणामी येथे केव्हाही धोका होऊ शकतो. गोंदिया, नागपूर, चंद्रपूर, हैदराबाद, रायपूरच्या दिशेने जाणारी वाहने याच मार्गाने धावतात. परंतु, कोहमारापासून मुंडीपारपर्यंत रस्त्याची रुंदी वाढलेली नाही. रस्त्याच्या दोन्ही बाजूला झाडे-झुडपी आहेत. याच मार्गावर डव्वाजवळ एकमेव अरुंद, कमी उंचीचा व कठडे नसलेला पूल असून तो पुलाच्या दोन्हीही बाजूला झाडे-झुडपी वाढल्याने अदृश्य स्थितीत आहे. परिणामी या पुलावर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# शिंगाडा तलावाची पाळ तत्काळ दुरुस्त करा - पूजा गायकवाड

## लघु पाटबंधारे विभागाला आदेश



**लोकशाही वार्ता / गोंदिया**
शहराच्या मध्यवर्ती भागात असलेला शिंगाडा तलाव हा शहराची जीवनवाहिनी म्हणून ओळखला जातो. शहराच्या पर्यावरण संरक्षणात भूगर्भजलपातळी टिकविण्यात आणि जैवविविधता वाढविण्यात या तलावाचे योगदान मोठे आहे. मात्र, या तलावाच्या पाळीला तडे गेल्याने धोका निर्माण झाला.

दरम्यान, 'शिंगाडा तलाव संकटात' या शीर्षकाखाली वृत्त प्रकाशित होताच उपविभागीय अधिकारी पूजा गायकवाड यांनी तातडीने बैठक घेत तपासणीसह योग्य ती उपाययोजना सुरू केली. लघू पाटबंधारे विभागाला पाळ दुरुस्तीचे आदेश दिले.

उपविभागीय अधिकारी पूजा गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली १० जुलै रोजी त्यांच्या कार्यालयात एक विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकीस लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषदेचे अधिकारी, नगर परिषद अभियंता सोनटक्के, गटविकास अधिकारी अरुण गिन्हेपुंजे, माजी नगरसेवक राजेश गुणेरिया उपस्थित होते. या बैठकीत तिरोडा शहर व परिसरातील सर्व महत्त्वाच्या तलावांची स्थिती तपासण्यात आली आणि शिंगाडा तलावावर विशेष चर्चा झाली.

बैठकीनंतर उपविभागीय अधिकारी गायकवाड यांनी शिंगाडा तलावाची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी तलावाच्या पाळीला गेलेले तडे आणि गळती दिसून आली. यामुळे भविष्यात तलाव फुटून आसपासच्या वस्त्यांना धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने तत्काळ हालचाल सुरू केली आहे, शिंगाडा तलावाची पाळ काही दिवसांपासून खराब होत असल्याच्या तक्रारी नागरिकांच्या होत्या.

### उपविभागीय अधिकाऱ्यांनी केली तलावाची पाहणी

**शिंगाडा तलावाच्या पाळीचे तांत्रिक मूल्यांकन त्वरित करावे, झालेल्या नुकसानीवर उपयुक्त उपयोजना तयार करून सादर करावी, दुरुस्ती व मजबुतीकरणाचे काम तातडीने सुरू करावे, नागरिकांची सुरक्षितता जपण्यासाठी इशारा फलक, सुरक्षा बॅरिकेट्स आणि सतत निगराणी ठेवावी, काम पूर्ण होईपर्यंत परिसर 'अलर्ट मोड'वर ठेवण्यात यावा, अशा सूचना उपविभागीय अधिकारी पूजा गायकवाड यांनी अधिकाऱ्यांना केल्या.**

लोकशाही वार्ता
# गडचिरोली
गुड मॉर्निंग
नागपूर, सोमवार, १४ जुलै २०२५/१२
epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta


## जिल्हास्तर योगासन स्पर्धेची तयारी

**गडचिरोली :** महाराष्ट्र योगासन स्पोर्ट असोसिएशन आणि गडचिरोली जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने आयोजित गडचिरोली जिल्हा योगासन निवड चाचणी २७ जुलै रोजी रविवारला स्थानिक शासकीय विज्ञान महाविद्यालयात आयोजित आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्पर्धकांनी स्पर्धेच्या दोन दिवसांपूर्वी म्हणजे २४ जुलैपर्यंत महाराष्ट्र योगासन स्पोर्टने दिलेल्या गुगल फॉर्मद्वारे नोंदणी करणे आवश्यक आहे. स्पर्धेच्या दिवशी वेळेवर नोंदणी करणाऱ्या स्पर्धकांना स्पर्धेत सहभागी होता येणार नाही. स्पर्धेसाठी मुले व पुरुष हाफ पँट मुली व महिलांसाठी योगा स्लॅक्स आणि टी-शर्ट असा पोशाख राहील.

## लाखो क्विंटल धान उघड्यावर; उचल केव्हा?

**एटापल्ली :** तालुक्यातील अनेक केंद्रांवर आदिवासी विविध कार्यकारी संस्थेमार्फत मागील खरीप हंगामातील धानाची खरेदी करण्यात आली. मात्र, त्यांची अद्याप उचल न झाल्याने कोट्यवधी रुपये किमतीचे खरेदी केलेले धान उघड्यावर ताडपत्री झाकून ठेवलेले आहे. संततधार पावसामुळे उघड्यावरील धान भिजले असून, या धानाला अंकुर फुटले आहेत. कोट्यवधी रुपये किमतीच्या धानांची नासाडी होत आहे. स्थानिक यंत्रणेच्या दुर्लक्षामुळे शासनाला कोट्यवधी रुपयांचा फटका बसत आहे, असा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. तालुक्यातील हेडरी, गेदा, तोडसा, कसनसूर, घोडसूळ, पिपली बुर्गी, जारावंडी, कुरूमवाडा आणि एटापल्ली या केंद्रांवर धानाची खरेदी करण्यात आली होती.

# पशुपालनास कृषी व्यवसायाचा दर्जा देण्याचा निर्णय पशुपालकांच्या मुळावर

## पशुपालनासाठी आता लागणार कर आणि वीज दर



**लोकशाही वार्ता/ गडचिरोली :** महाराष्ट्र राज्य सरकारने पशुपालन व्यवसायास कृषी व्यवसायाचा दर्जा देण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा राज्याच्या पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे यांनी शुक्रवारी विधानसभेत केल्यानंतर राज्यभरातून शेतकरी व पशुपालकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. पशुपालनास कृषी व्यवसायाचा दर्जा देणे हे पशुपालकांच्या मुळावर उठणार असून या निर्णयामुळे पशुपालनासाठी आता वेगळा कर व वीज दरदेखील लागणार आहे.

मुळात शासनाने अद्याप कृषीला व्यवसायाचा दर्जा दिला नाही. शेती व्यवसायात शेतकऱ्यांची माती केली, त्याप्रमाणेच आता पशुपालकांची माती करायची आहे, हेच सरकारने ठरविल्याची संतप्त भावना शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे. यापुढे कृषी व्यवसायाप्रमाणे पशुपालन व्यवसायाला कर आकारणी करण्याचे धोरण मुंडे यांनी जाहीर केले आहे. त्यामुळे आजपर्यंत शासनाच्या तीक्ष्णनजरेतून मोकळा राहिलेल्या पशुपालकांच्या खिशावर आता सरकारचा डोळा असल्याचे यातून स्पष्ट होत आहे.

राज्यात शेतीशी निगडितअसलेला व्यवसाय म्हणजे पशुपालन व्यवसाय आहे. शेतीला बैल बारदाना तसेच दुभती जनावरे यांची जोड देऊन अनेक शेतकरी शेती करतात. मात्र पशुपालना-सारख्या क्षेत्राकडे राज्य सरकारचे आजपर्यंत दुर्लक्ष होते की काय, अशी शंका या निर्णयातून पुढे येत आहे. राज्यात ७६ लाख ४१ हजार पशुपालक कुटुंबे असून सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे पशुजन्य उत्पादनातून ७७०० कोटी रुपयांची वाढ होणार असल्याचा दावा पशुसंवर्धन मंत्र्यांनी माहिती देताना केला आहे.

वास्तविक राज्यामध्ये कृषीला व्यवसायाचा दर्जा नाही. राज्यात कृषीला व्यवसायाचा दर्जा द्यावा यासाठी गेली अनेक वर्षे शेतकरी संघटना विविध पातळीवर आंदोलने करीत आहेत. मात्र, कृषीला व्यवसायाचा दर्जा नसताना पशुसंवर्धन मंत्र्यांनी पशुपालनाला कृषी व्यवसायाचा दर्जा देणे म्हणजे गंमतीचा विषय ठरला आहे. ही घोषणा करण्यामागे राज्यातील पशुपालकांचा खिसा कापण्याचे षडयंत्र राज्य सरकारने रचल्याचे स्पष्ट झाले आहे.

परंपरागत शेतीत जनावरांच्या गोठ्यामध्ये विजेचा बल्ब, कडबा कुट्टी, तणिस यासाठी शेतकरी आपल्या शेतीपंपाच्या वीज जोडणीतूनच वीज वापर करतात. मात्र, आता पशुपालकांना यापुढे या व्यवसायासाठी वीजदर आकारणीकेली जाणार आहे. शिवाय स्थानिक ग्रामपंचायतीचा करही आता पशुपालकांना भरावा लागणार आहे. कृषी व्यवसायाप्रमाणे ही कर आकारणी करण्याचे धोरण मंत्री मुंडे यांनी जाहीर केले आहे. त्यामुळे आजपर्यंत सरकारच्या तीक्ष्ण नजरेतून मोकळा राहिलेल्या पशुपालकांच्या खिशावर आता सरकारचा डोळा असल्याचे यातून स्पष्ट होत आहे.

### जिल्ह्यात ८ लाख पशूधन

जिल्ह्यात सन २०१९ मध्ये २० वी पशुगणना झाली होती. त्यानुसार जिल्ह्यात गाय वर्ग ४५ हजार ४७१, म्हैस वर्ग ६६ हजार २५९, मेंढ्या १८ हजार ६०५, शेळ्या २ लाख ३९ हजार ५८७, वराह २५ हजार २१० असे एकूण ८ लाख ९ हजार १३२ इतके पशुधन होते. यात आता आणखी वाढ झाली आहे. जिल्ह्यात आधीच पशुपालनाची बिकट अवस्था आहे. दुग्ध व्यवसाय डबघाईस आला आहे. पशुपालन करणाऱ्या पालकांना आता कर लावल्यास जिल्ह्यातून पशुपालन हद्दपार होण्याची भीती व्यक्त होत आहे.

## दृष्टिक्षेप

### मलेरियाने युवकाचा मृत्यू

**धानोरा :** जिल्हयात मलेरियाचा प्रादुर्भाव वाढला असून धानोरा तालुक्यात एका युवकाचा मलेरियाची लागण झाल्याने मृत्यू झाल्याची घटना उजेडात आली आहे. कपिल नामदेव पदा (२५) सिन्सूर (मोहली) असे मृतकाचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार सदर युवकावर मागील तीन दिवसापासून रांगी येथील आरोग्य केंद्रात उपचार सुरू होते. मात्र, प्रकृतीत सुधारणा न झाल्याने त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात रेफर करण्यात आले. येथे तीन दिवसापासून उपचार सुरू असतांना उपचारादरम्यान कपील पदा या युवकाचा मृत्यू झाला. विशेष म्हणजे कोटगुल प्राथमिक आरोग्य केंद्रातंर्गत मागील बारा दिवसात १०० मलेरिया रुग्ण आढळून आले असल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वप्निल चोरूडे यांनी दिली.

### घोट येथील पथदिवे बंद

**घोट :** ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावात लावण्यात आलेले पथदिवे ऐन पावसाळ्यात बंद झाले आहेत. त्यामुळे येथील नागरिकांना रात्रीच्या वेळी अंधाराचा सामना करावा लागत आहे. पथदिवे तत्काळ सुरू करण्यात यावे, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा घोटच्या सरपंच रूपाली दुधबावरे व नागरिकांना महावितरण कंपनीला दिला आहे. पथदिवे सुरू करण्याबाबत यापूर्वी महावितरणला निवेदन देण्यात आले आहे. मात्र, तरीही त्यांच्याकडून कसलीही उपाययोजना केली जात नसल्याचे पाहावयास मिळत आहे. परिणामी येथील नागरिकांना रात्रीच्या वेळी अंधाराचा सामना करावा लागत आहे.

पावसाळयाच्या दिवस असल्याने सरपटणाऱ्या प्राण्यांपासून नागरिकांच्या जिवाला धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अंधारामध्ये सरपटणारे प्राणी कधी जीवघेणा बनेल यांची काही खात्री नाही सोबतच शॉर्टसर्किटमुळे वीजपुरवठा खंडित होत असल्याची समस्या ही मोठ्या प्रमाणात दिसुन येते एकदा वीजपुरवठा खंडीत झाला तर पुन्हा वीज येण्यासाठी खुप वेळ लागतो याकडे तत्काळ लक्ष द्यावे, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा सरपंच रूपाली दुधबावरे व नागरिकांनी दिला आहे.

## साथीच्या आजारांत वाढ

**गडचिरोली :** बदलत्या वातावरणामुळे तसेच डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने लहान मुलांसह नागरिकांना सर्दी, खोकला, ताप आदी आजाराची लागण झाली आहे. त्यामुळे उपचारासाठी हे रुग्ण सरकारी तसेच खासगी रुग्णालयात गर्दी करीत आहेत. नुकताच सात, आठ दिवस पावसाची संततधार सुरू होती. गेल्या तीन दिवसांपासून पावसाने उसंत्त दिली आहे. त्यामुळे उन्ह व सावलीचा खेळ सुरू आहे. अशातच डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. शिवाय गेल आठ दिवस सतत पाऊस आल्याने नदीच्या पाण्याची पातळी वढलेली होती त्यामुळे नळाच्या पाईप लाईद्वारे दुषित पिण्याच्या पाण्याचे वहन होत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम दिसुन येत आहेत. आरोग्य विभागाने ठिकठिकाणी आरोग्य शिबिर घ्यावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# प्रॉपर्टी कार्डपासून वंचित लोकांची आलापल्लीत सभा



**लोकशाही वार्ता/ आलापल्ली :** माजी कॅबिनेट मंत्री तथा आमदार डॉ. धर्मरावबाबा आत्राम यांच्या मार्गदर्शनात आलापल्ली गावातील अनेक नागरिकांना प्रॉपर्टी कार्डचे वितरण करण्यात आले आहे. मात्र, तरीही काही नागरिक अद्याप वनपट्ट्यापासून वंचित आहेत. अशा वंचित असलेल्या नागरिकांची सहविचार सभा शनिवारी (दि.१२) आलापल्लीत झाली. यावेळी वन विभाग आणि लाभार्थी यांच्यात समन्वय साधून प्रॉपर्टी कार्डचा पक्ष निकाली लावण्याचे आश्वासन सिनेट सदस्य तथा राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष तनुश्री धर्मरावबाबा आत्राम यांनी दिले. जोपर्यत प्रॉपर्टी कार्ड नसेल तोपर्यंत लाभार्थ्यांना आपल्या भूखंडावर इतर लाभ घेता येत नाही. त्यामुळे प्रॉपर्टी कार्ड असणे गरजेचे आहे. नागरिकांना प्रॉपर्टी कार्ड मिळवून देण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करणार, त्यासाठी प्रत्येकाने आपली आवश्यक कागदपत्रे जुळवून ठेवावी. वनविभाग व लाभार्थी यांच्यात योग्य समन्वय साधून हा प्रश्न निकाली काढण्यात येईल, असे तनुश्री आत्राम यांनी सांगितले.

या सभेला विधानसभा प्रमुख लक्ष्मण येर्रावार, ग्रामपंचायत सदस्य पुष्पा अलोने, राष्ट्रवादीचे जिल्हा महासचिव कैलास कोरेत यांनीही या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य मनोज बोलुवार, सोमेश्वर रामटेके, अनुसया सस्पीडवार, शारदा कळते, वासुदेव पेद्दीवार, पराग पांढरे, कार्तिक निमसरकार, शारदा भुजंगराव कडते, कैलास कोरेत आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# कोजबीवासीयांची पाण्यासाठी वणवण

## पंधरा दिवसांपासून नळयोजना बंद, नागरिकांचा संताप




**लोकशाही वार्ता/ वैरागड :** आरमोरी पंचायत समिति अंतर्गत येणाऱ्या कोजबी गट ग्रामपंचायतमधील कोजबी, लोहारा, करपडा आणि सोनपूर येथील नागरिकांना ग्रामपंचायतीच्या निष्काळजीपणामुळे पिण्याच्या पाण्यासाठी भर पावसाळ्यात वणवण करीत भटकावे लागत असून नागरिकांकडून रोष व्यक्त केला जात आहे.

केंद्र शासनाच्या जल जीवन योजने अंतर्गत कोट्यावधी रुपये खर्च करून कोजबी गट ग्रामपंचायत मध्ये हर घर जल नळ योजना राबविण्यात आली. गेल्या पंधरा दिवसांपासून नळ योजना पूर्णपणे बंद असल्याने भर पावसाळ्यात नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. परिणामी शुद्ध पाणी विकत घेण्याची पाळी आली आहे. कोजबी गट ग्रामपंचायतीचा कारभार सध्या रामभरोसे सुरू आहे. ग्रामपंचायतीच्या सरपंच प्रसूती रजेवर गेले असल्याने संपूर्ण कारभार प्रभारी ग्रामपंचायत अधिकाऱ्याच्या हातात आहे. ऐन पावसाळ्यात गावात पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. त्याचबरोबर नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.

ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे चारही गावांतील नाल्यांची सफाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे नाल्या कचऱ्याने तुडुंब भरल्या असून सांडपाणी रस्त्यावर वाहते. नाली सफाई अभावी डासांचे प्रमाण वाढले असून दुर्गंधी पसरत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याची समस्या निर्माण झाली आहे. नागरिकांनी ग्रामपंचायतीकडे वारंवार तक्रारी करूनही दखल घेतली जात नसल्याने ग्रामपंचायतीच्या कारभारावर रोष व्यक्त केला जात आहे.

### प्रभारी अधिकाऱ्याकडे ग्रामपंचायतीचा कारभार

ग्रामपंचायतीचा कारभार प्रभारी अधिकाऱ्यांकडे असून ते आठवड्यातून एक ते दोन दिवसच येत असल्याने स्थानिक पातळीवर कोणताही ठोस निर्णय घेतला जात नाही. स्थायी अधिकारी देण्याकरिता ग्रामसभेने ठराव पारित करून सुद्धा प्रशासनाने ग्रामसभेच्या ठरावाला केराची टोपली दाखवली आहे. नागरिकांच्या समस्या अधिकच बिकट होत आहेत. तातडीने नळ योजना सुरू करणे, नाल्यांची सफाई आणि ग्रामपंचायतीच्या कारभारात सुधारणा करण्याची मागणी केली जात आहे. प्रशासनाने याबाबत तत्काळ लक्ष घालावे अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# दुबार पेरणीसाठी कमी कालावधीच्या धानाची निवड करावी

## वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. किशोर झाडे यांचे आवाहन

**गडचिरोली :** मागील आठवड्यात जिल्ह्यात सर्वदुर झालेल्या अतिवृष्टीमुळे ज्या शेतकऱ्यांच्या शेतावरील धान पऱ्हयांचे नुकसान झाले अशा शेतकरी बांधवांनी आपत्कालीन पिक व्यवस्थापना अंतर्गत पिकांची दुबार लागवड करण्यासाठी कमी कालावधीच्या धानांच्या वाणांची निवड करावी, असे आवाहन कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. किशोर झाडे यांनी केले आहे. फळबाग आणि भाजीपाला पिकांमध्ये अतिवृष्टीमुळे पाण्याचा साठा, जमिनीची धुप, मुळे कुजणे, फळाची सळ, किड व रोगाचा प्रादुर्भाव इत्यादी समस्या निर्माण होतात. या परिस्थितीत फळे व भाजीपाला पिकांचे तात्काळ नियोजन करण्यासाठी पाण्याचा निचरा करावे व शेतात पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. भाजीपाला लागवड बेड व सरी वरंबा पध्दतीचा अवलंब करावे. मुळांची कुज टाळण्यासाठी ट्रायकोडर्मा आणि सुडोमोनस फ्युरेसन्स यासारख्या जैविक बुरशीनाशकांचा वापर करावा. अतिवृष्टीमुळे खत बाहेर वाहून जाते म्हणून फोलीअर स्प्रे (पानांव्दारे खत) पध्दतीचा अवलंब करावा. यामध्ये १९:१९:१९ विद्राव्य खताचा ५ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणात भाजीपाला पिकांवर फवारणी करावी, असे आवाहन कृषि विज्ञान केंद्र, सोनापुर येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख डॉ. किशोर झाडे यांनी केले आहे.

### अशी करावी बीजप्रक्रिया

निवड केलेल्या बियाण्यांस ३ टक्के मिठाच्या द्रावणाची बिजप्रक्रिया करून बियाणे २४ तास सावलीत वाळवावे. पेरणीपूर्वी ४ ग्रॅम प्रति किलो या प्रमाणात ट्रायकोडर्मा या बुरशीनाशकाची बिजप्रक्रिया करावी व धान पिकाचे पऱ्हे रोहु पध्दतीने टाकून पुर्नःपेरणी करावी. रोहु पध्दतीनुसार पऱ्हे टाकण्यासाठी धान बियाणे २४ तास पाण्यामध्ये भिजु घालावे त्यानंतर भिजलेले धान बियाणे पाण्यातून काढून घेऊन गोणपाटामध्ये ३६-४८ तास मोड येण्यासाठी सैलसर बांधून व्यवस्थित ठेवावे, पोत्यात ओलावा राहण्यासाठी त्यावर पाणी शिंपडावे. ३६-४८ तासानंतर बियाण्यांना मोड आल्यानंतर सदरील मोड आलेले बियाणे चिखलणी केलेल्या शेतात हलक्या हाताने शिंपडावे.

# खा. नामदेव किरसान यांच्या वाढदिवसानिमित्त स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा व मोफत पुस्तक वाटप

**गडचिरोली :** जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील युवक युवतींना स्पर्धा परिक्षेच्या ओघात आणण्यासाठी गडचिरोली - चिमूर लोकसभा क्षेत्राचे लोकप्रिय खासदार डॉ. नामदेव किरसान यांच्या वाढदिवसानिमित्त स्पर्धा परीक्षा ची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता करिअर मार्गदर्शन कार्यशाळा व मोफत पुस्तक वाटप कार्यक्रम शिबिर आज १४ जुलै रोजी सकाळी १० वाजता सुमानंद सभागृह घेण्यात येत आहे. तरी जिल्ह्यातील आदिवासी बहुल भागातील अतिदुर्गम भागातील व शहरी भागातील विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे आवाहन खा. डॉ. नामदेव किरसान मित्रपरिवार तथा काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

स्पर्धा परिक्षेची तयारी करणारे विद्यार्थी हे गोरगरिब वर्गातून आलेले असतात अनेक विद्यार्थी हे दुर्गम भागामधून स्थानिक जिल्ह्याच्या ठिकाणी स्पर्धा परिक्षेची तयारी करण्यासाठी रूम करून राहात असतात त्या विद्यार्थ्यांना आर्थिक चनचन हे नेहमीची असते शिवाय पुस्तके घेण्यासाठी मोठी रक्कम मोजावी लागत असते या सर्व बाबींचा विचार करून खा. डॉ. नामदेव किरसान मित्रपरिवाराने जिल्ह्यात खा. डॉ. नामदेव किरसान यांच्या वाढदिवसानिमित्य हा अनोखा उपक्रम राबविण्याचे ठरविले.

या स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळेत विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्याचे कार्य करण्यात येणार असुन स्पर्धा परिक्षेची तयारी करतांना कोणत्या सुत्राचा वापर करून आपण लवकर यश संपादन करू शकतो यावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तरी सर्व युवक वर्गांनी या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेला उपस्थिती राहून या कार्यशाळेचा लाभ घ्यावा जिल्ह्यात पहिल्यांदा अशाप्रकारचा उपक्रम राबविण्यात येत असुन या उपक्रमाचा लाभ हा तरुण पिढीला व स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात होणार आहे.

तरी जिल्ह्यातील दुर्गम, अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांनी तसेच शहरी भागातील विद्यार्थ्यांनी खा. डॉ. नामदेव किरसान यांच्या वाढदिवसानिमित्य सुमानंद सभागृह मध्ये ठेवण्यात आलेल्या स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळेला मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून मार्गदर्शन व मोफत वाटप होणाऱ्या पुस्तकाचा लाभ घ्यावा, असे आवाहन खा. डॉ. नामदेव किरसान मित्रपरिवार तथा काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केले आहे.




लोकशाही वार्ता
वर्धा
गुड मॉर्निंग
नागपूर, सोमवार, १४ जुलै २०२५/९
epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta


## ट्रॅव्हल्समधून प्रवासात ५० हजार रुपये चोरी

**वर्धा :** ट्रॅव्हल्समधून प्रवासादरम्यान महिलेजवळील ५० हजार रुपये अज्ञाताने चोरून नेले. ही घटना तळेगाव (टा.) शिवारात घडली. सोनेगाव (स्टे.) येथील फिर्यादीने महिला बचतगटाचे ५० हजार रुपये वध्यार्तील बँकेतून काढले. ती रक्कम घेऊन हिंगणघाकडे जाणाऱ्या ट्रॅव्हल्समध्ये सोनेगाव (स्टे.) येथे जात होत्या. प्रवासादरम्यान बाजूला बसलेल्या दोन अज्ञात महिलांनी फिर्यादीच्या बॅगमधून ५० हजार रुपये लंपास केले. याप्रकरणी तक्रारीवरून अल्लीपूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

## डोक्याला दुखापत झाल्याने इसमाचा मृत्यू

**वर्धा :** पाऊस सुरू असताना पाय घसरून पडलेल्या इसमाच्या डोक्याला दुखापत झाली. उपचारादरम्यान इसमाचा मृत्यू झाला. ही घटना १० जुलै रोजी घडली. प्रफुल्ल नीळकंठ गायकवाड (वय ४०) रा. सेवाग्राम असे मृताचे नाव आहे. ९ जुलै रोजी पाऊस सुरू असताना घरापुढे ते पाय घसरून पडले. त्यात त्यांच्या डोक्याला दुखापत झाली. त्यांना सेवाग्राम रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादम्यान त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी सेवाग्राम पोलिसांनी नोंद केली.

### दृष्टिक्षेप

## ऑटोतून प्रवासादरम्यान १४ हजार रुपये लंपास

**वर्धा :** ऑटोतून प्रवासादरम्यान १४ रुपये तसेच पासबुक असलेली थैली चोरट्यानी लंपास केली. ही घटना ९ जुलै रोजी आर्वी येथे घडली. आर्वी येथील खरडी वॉर्ड परिसरात राहणारे मधुकर बोधणे यांनी बँकेतून १४ हजार रुपये काढले. घरी जाण्याकरिता बँकेसमोर गेल्यानंतर ते ऑटोत बसले. दरम्यान, तोंडाला कापड बांधून असलेल्या दोन महिला ऑटोत बसल्या. घरी गेल्यानंतर पिशवीत बघितले असता पैसे तसेच पासबुक दिसले नाही. पिशवी कापून अज्ञात महिलांनी १४ हजार रुपये तसेच बँकेचे पासबुक लंपास केल्याची तक्रार पोलिसांत करण्यात आली. त्यावरून आर्वी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पुढील तपास आर्वी पोलिस करीत आहेत.

# अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करा – खा. काळे

## संसद सदस्य रस्ता सुरक्षा समितीची आढावा बैठक



**लोकशाही वार्ता/वर्धा**

जिल्ह्यातील वाहनामुळे होणारे रस्त्यावरील अपघाताचे प्रमाण कमी करून पर्यायाने होणारी जीवित हानी टाळण्यासाठी मार्गावरील वारंवार होणाऱ्या अपघात प्रवणस्थळ निश्चित करून उपाययोजना करण्यासोबतच शाळा परिसरातील रस्त्यावर गतिरोधक लावण्यात यावे, अशा सूचना खासदार अमर काळे यांनी केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात संसद सदस्य रस्ता सुरक्षा समितीची आढावा बैठक समितीचे अध्यक्ष तथा खासदार काळे यांच्या अध्यक्षेखाली घेण्यात आली. त्यावेळी त्यांनी या सूचना दिल्या. बैठकीला अप्पर जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सतीश अंभोरे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी स्नेहा मेढे, जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम गुंडतवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता महेश मोकलकर तसेच राष्ट्रीय महामार्ग, सामान्य रुग्णालय, वाहतुक शाखेचे पोलिस निरीक्षक आदी उपस्थित होते.

बऱ्याच रस्त्यावर प्लास्टिक फायबरचे गतिरोधक असून या गतिरोधकामुळे अपघाताची शक्यता असते. त्यामुळे असे गतिरोधक काढून डांबरीकरणाचे गतिरोधक लावावे. त्याचबरोबर शाळालगत असलेल्या रस्त्यावर गतिरोधक लावण्याची मागणी केल्यास संबंधित विभागाच्या अखत्यारित्या असलेल्या विभागांनी गतिरोधक लावून घ्यावे. प्रत्येक टोलनाक्यावर असलेल्या रुग्णवाहिका सुस्थितीत ठेवून अपघातग्रस्तांना वेळेत उपचार उपलब्ध करून द्यावा. यासाठी कारंजासह अन्य ट्रामा केअर मध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध असाव्या, अशा सूचना खासदार अमर काळे यांनी दिल्यात.

आष्टी येथे महामार्गालगत असलेल्या हुतात्मा महाविद्यालयात विरुध्द दिशेने गावातून येणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात संख्या असल्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाविद्यालयासमोर मार्गावर स्काय वॉक मार्ग तयार करण्याच्या सूचनाही यावेळी काळे यांनी दिल्या. रस्त्यावर येणाऱ्या वन्यप्राण्यांमुळे होणारे अपघात कमी करण्यासाठी वन विभागाच्या समन्वयाने आवश्यक उपाययोजना करण्यात याव्या. तळेगाव येथून आष्टीकडे जाणाऱ्या रस्त्यावर अपघाताचे प्रमाण जास्त असल्याने आवश्यक उपाययोजना करण्याचेही यावेळी खासदार म्हणाले.

यावेळी बांधकाम बैठकीमध्ये जिल्ह्यात ३२ अपघात प्रवणस्थळ निश्चित करण्यात असल्याचे बांधकाम विभागाच्यावतीने सांगण्यात आले असून नव्याने अपघात प्रवणस्थळ निश्चितीचे काम हाती घेण्यात येणार आहे. तसेच सालोड चौरस्ता, सावंगी, जाम, दत्तपूर चौरस्ता, कारंजा येथे येलो बॉक्स स्थळ परिवहन विभागाच्यावतीने निश्चित करण्यात आलेले आहे, असे बांधकाम विभागाच्यावतीने सांगण्यात आले. पुढील महिन्यात शाळा, महाविद्यालयस्तरावर विद्यार्थ्यांमार्फत रस्ता अपघात सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात येणार असल्याचे महेश मोकलकर यांनी बैठकीत सांगितले.

## शहरात जीवरक्षक फाउंडेशनकडून दोन निमविषारी दुर्मिळ सापांना जीवदान



**लोकशाही वार्ता/हिंगणघाट**

दि.१३जुलै रोजी शहरातील पटवारी कॉलनी येथून रेस्क्यू टीमचे सदस्य भाविक कोपरकर व सहकारी मित्र सौरभ राऊत यांनी घटनास्थळ गाठून तिथे भारतीय अंडेखाऊ साप सुरक्षितपणे रेस्क्यू केला. हा साप निम्नविषारी असून भारतीय अंडीभक्षक साप हा फक्त पक्ष्यांची अंडी खाऊनच आपली उपजीविका चालवितो. अंडी सोडून इतर कुठलेही भक्ष्य तो घेत नाही.

हा साप वन्यजीव संवर्धन अधिनियम १९७२नुसार अनुसूची एक म्हणजेच वाघ असलेल्या सूचीमध्ये समाविष्ट आहे. या सापाचा महत्त्वाचा अधिवास असून विदभार्तील शेकडो एकर झुडपी जंगले आज अतिक्रमणाच्या विळख्यात आहेत. झुडपी जंगले संपुष्टात येत असल्यानेच पक्ष्यांचे अधिवास संपुष्टात येत आहे. त्यांच्या अंड्यांवर गुजराण करणारा अंडीभक्षक साप पुन्हा एकदा काळाच्या पडद्याआड जाण्याची चिन्हे दिसत आहेत. असे सर्पमित्र भाविक कोपरकर यांनी सांगितले.

१३ जुलै रोजी स्थानिय हिंगणघाट शहरात भारतीय विद्या भवन्स शाळेत साप असल्याची माहिती वन्यजीवरक्षक राकेश झाडे व टीमचे सदस्य चेतन गावंडे यांना मिळाली असता घटनास्थळी पोहोचून तिथे हरणटोळ हा साप आढळून आला हरणटोळ साप निम्नविषारी असतो हा केवळ एकाच हिरव्या रंगात सापडत नाही तर कधी हिरवा आणि पिवळा तर कधी तपकिरी अशा मिश्र रंगांमध्ये सुद्धा सापडतो, त्यची जीभ ही लांब आणि गडद हिरव्या रंगाची असते जीने तो आजूबाजूच्या स्तिथीचा अंदाज घेत असतो. असे राकेश झाडे यांनी सांगितले. हे दोन्ही साप सुरक्षितपणे वणनिसर्ग सानिध्यात सोडले गेले आहेत.

## सहा वर्षानंतर सायगव्हान येथे पोहचली लालपरी; उत्साहात स्वागत



**लोकशाही वार्ता/समुद्रपुर**

सायगव्हान येथे ६ वर्षांपासून बस बंद झाल्याने वडगाव, सायगव्हान, सावंगी, लोखंडी येथिल शाळकरी विद्यार्थी व नागरीकांना वडगाव पाटीपर्यंत पायपीट करावी लागत होती. गावकऱ्यांनी यासंबंधी वेळोवेळी हिंगणघाट आगारासी संपर्क साधून निवेदन देऊन सायगव्हान बस सुरू करण्याच्या सूचना दिल्या होत्या. या सुचनाची दखल घेऊन आगाराच्या वतीने शुक्रवारी ११ वाजता बस पाठविण्यात आली गावात लालपरीचे आगमन होताच नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी शाळकरी विद्यार्थी व गावकऱ्यांनी बसची विधीवत पूजा करून चालक व वाहकाचे पुष्प देऊन स्वागत केले.गावात बस सुरू झाल्याने सायगव्हान सावंगी लोखंडी वडगाव येथील नागरीकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

## जुनाट व्रणांवरील उपचार विभाग कार्यान्वित

### म. गांधी आयुर्वेद रुग्णालयात नवी आरोग्य सुविधा



**लोकशाही वार्ता/वर्धा**

सालोड (हिरापूर) येथील महात्मा गांधी आयुर्वेद महाविद्यालय, रुग्णालय व संशोधन केंद्रात जुनाट जखम व व्रण असणाऱ्या रुग्णांची विशेष तपासणी आणि उपचारांकरिता नवीन सुसज्ज विभाग कार्यान्वित करण्यात आला. या विभागाचे उद्घाटन गुरूपौर्णिमेला दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ललितभूषण वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले.

या नवनिर्मित विभागामध्ये जुनाट जखम न भरणे, जुनाट न भरणारे व्रण असणे, भाजल्यामुळे व्रण न भरता तसाच राहणे, जखमांमध्ये कीड पडणे, दुर्गंध येणे, मधुमेहामुळे पाय सुजणे, अशा आरोग्यविषयक समस्यांनी त्रस्त रुग्णांना दजेर्दार व आधुनिक तंत्रज्ञानासोबतच पारंपरिक आयुर्वेद पद्धतीने उपचार उपलब्ध होतील. विभागात आयुर्वेद पद्धतीने ड्रेसिंग, संसर्ग नियंत्रण, जळूद्वारे रक्तशुद्धी चिकित्सा (लिच थेरपी), त्वचारोपण कर्म, क्षार कर्म, सिरावेध उपचार, व्रणबस्ती कर्म, आवश्यकतेनुसार शस्त्रक्रिया अशा विविध सुविधा रुग्णांना प्राप्त होतील, असा विश्वास आयुर्वेद महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. भरत राठी यांनी व्यक्त केला.

अशाप्रकारचे जुनाट व्रण चिकित्सा केंद्र प्रथमच कार्यान्वित होत असल्याने कुलगुरू डॉ. वाघमारे यांनी मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. वैशाली कुचेवार, शल्यतंत्र विभागप्रमुख डॉ. शीतल आसुटकर, उपअधिष्ठाता डॉ. गौरव सावरकर, उपअधीक्षक डॉ. ऋषिकेश ठाकरे यांचे अभिनंदन केले.

## अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघातर्फे दोंदे दाम्पत्याच्या स्मृतिदिनी कार्यक्रम

**लोकशाही वार्ता/हिंगणघाट**

आखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ जिल्हा वर्धातर्फे शिक्षक नेते स्व.भाईसाहेब ऊर्फ अरुण दोंदे व स्व.सुलभाताई दोंदे यांचा स्मृतिदिन समारंभ रविवार १३ जुलै २०२५ रोजी मधुकर चाफले बिडकर वॉर्ड हिंगणघाट येथे सकाळी दहा वाजता आयोजित करण्यात आला होता.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आखिल महाराष्ट्र प्राथमिक सेवानिवृत्त शिक्षक संघाचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष अशोक सोरटे हे उपस्थित होते. अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या महाराष्ट्र राज्य सरचिटणीस माया चाफले, वर्धा जिल्हा महिला आघाडी माधुरी विहिरकर, हिंगणघाट तालुका अध्यक्ष गजानन भुते, समुद्रपूर तालुका अध्यक्ष श्रीधर घोडमारे,राजाभाऊ मन्ने हे उपस्थित होते.

सोरटे यांनी अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या स्थापनेपासून आजपावेतोच्या प्रवासाची सविस्तर माहिती सांगितली. जागतिक स्तरावर कार्य करणाऱ्या या संघाविषयी माहिती सांगितली.सदर कार्यक्रमाची सुरुवात शिक्षक नेते स्व.भाईसाहेब दोंदे व शिक्षक नेत्या स्व. सुलभाताई दोंदे यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून करण्यात आली. उपस्थित सर्व मान्यवरांनी स्मृतिदिनानिमित्त स्वर्गीय शिक्षक नायक प्रा. अरुण ऊर्फ भाईसाहेब दोंदे व शिक्षक नेत्या स्वर्गीय सुलभा अरुण दोंदे यांना अभिवादन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या राज्य सरचिटणीस माया चाफले यांनी केले.

त्यात शिक्षकांच्या अनेक समस्या सोडवितांना स्वर्गीय उभयतांनी केलेल्या कायार्ला उजाळा देत त्यांनी केलेले सहकार्य व संघाच्या वतीने दिलेले योगदान हे अतुलनीय आहे असे सांगितले तसेच आज शिक्षक संघटना वाढायला हवी शिक्षकांची संघभावना वाढवून शिक्षकांच्या अनेक समस्यांचे निराकरण संघाच्या माध्यमातून करण्याबाबत प्रस्ताव सादर केल्या तसेच विविध समस्यांच्या निराकरणासाठी संघ कसे पाऊल उचलत आहे, याबद्दलदेखील माहिती दिली. या कार्यक्रमाप्रसंगी सेवानिवृत्त शिक्षक गजानन अवचट, सुरेश जोगे ,मुकुंद भलमे, यशवंत चांभारे, गोपाल शिंदे, पुरुषोत्तम बकाने, कवडूजी शेळके, मधुकर चाफले, जगदीश झाडे, उल्हास राठोड उपस्थित होते.

तर कार्यरत शिक्षक सचिन येवले,संजय पादाडे, सचिन कामडी ,वैशाली लांजेवार व मयुरी देशमुख उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर वाघमारे यांनी तर आभार प्रदर्शन राजाभाऊ यांनी केले. स्व. शिक्षक नायक प्रा. अरुण उर्फ भाईसाहेब दोंदे व शिक्षक नेत्या स्वर्गीय सुलभाताई अरुण दोंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त श्रद्धांजली देत सदर कार्यक्रमाची सांगता करण्यातआली.

## मध्यप्रदेशातून दारूची वाहतूक, आठ लाखांचा मुद्देमाल जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**लोकशाही वार्ता/वर्धा**

मध्यप्रदेशातून दारू वाहून आणणाऱ्यावर कारवाई करत पोलिसांनी दारूसाठा, वाहनाहस आठ लाख २३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

सेवाग्राम पोलिस ठाण्याच्या परिसरात गस्तीदरम्यान, मध्यप्रदेश येथुन कारमध्ये विदेशी दारूची अवैधरित्या वाहतूक करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी पवनार सेवाग्राम मार्गावर नाकेबंदी करून छापा टाकला असता कारचालक अमर कंजर रा. इतवारा बाजार, वर्धा हा मोक्यावरून पसार झाला. त्याचा साथीदार शुभम मधू पाला रा. इतवारा बाजार, वर्धा मिळून आला. आरोपीच्या ताब्यातून ३ लाख १५ हजार रुपये किमतीचा दारूसाठा, मोबाईल, वाहन असा ८ लाख २३ हजार रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. पोलिसांनी मुद्देमाल जप्त करत गुन्हा दाखल केला. ही कारवाई पोलिस अधीक्षक अनुराग जैन यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, पोलीस अंमलदार सचिन इंगोले, प्रमोद पिसे, विकास मुंढे, अरविंद इंगोले, राहुल अधवाल, प्रफुल पुनवटकर, सुगम चैधरी, शुभम राउत यांनी केली.

## प्रा. डॉ. प्रवीण वानखेडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

### परिवर्तनधारा साहित्य कला मंचाचे आयोजन

**लोकशाही वार्ता/वर्धा**

परिवर्तनधारा साहित्य कला मंच, ही संस्था वर्धा शहरात अनेक वर्षांपासून कार्यरत असून या संस्थेद्वारे सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, विज्ञानवादी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या संस्थेने संस्थेचे संस्थापक उपाध्यक्ष व वर्धा जिल्ह्यात सामाजिक, शैक्षणिक आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणारे प्रा. डॉ. प्रवीण वानखेडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ खुल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे. सलग दुसऱ्या वर्षी आयोजित होणाऱ्या या स्पर्धेचा विषय 'भारत राष्ट्राची निर्मिती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर' हा असून ही स्पर्धा १० ऑगस्ट रोजी सत्यनारायण बजाज सार्वजनिक जिल्हा ग्रंथालय, वर्धा येथे पार पडणार आहे.

स्पर्धेचा उद्घाटन समारंभ सकाळी ९.३० वाजता प्राचार्य वसंतराव मुरारकर यांच्या अध्यक्षते संपन्न होणार असून उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते रणजीत पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी मंचावर डॉ. अनिता प्रवीण वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. उद्घाटन कार्यक्रमानंतर लगेच स्पर्धा सुरू होईल. स्पधेर्चा समारोपीय कार्यक्रम सायंकाळी ६ वाजता असून यावेळी पुरस्कार वितरण आणि व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडणार आहे. पुरस्कार विजेत्या स्पर्धकांचा पारितोषिक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सन्मान केल्या जाईल. याचवेळी व्याख्यानाचा कार्यक्रम संपन्न होईल. व्याख्यानाच्या कार्यक्रमात प्रकाश दार्शनिक, राष्ट्रीय बौद्धिक प्रमुख, समता सैनिक दल, नागपूर हे 'भारत राष्ट्र निर्मिती संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका आणि आपली जबाबदारी' या विषयावर मांडणी करतील. प्रत्येक स्पर्धकाला विषय मांडण्यासाठी आठ मिनिटांचा अवधी दिला जाईल. स्पर्धकांचे व्हिडीओ पाहून स्पधेर्तील अंतिम ३५ स्पर्धक निवडल्या जातील. स्पर्धेत प्रवेश घेण्याची अंतिम तारीख ३० जुलै २०२५ आहे. इच्छुक स्पर्धकांनी प्रा. प्रशांत जिंदे, प्रा. महेंद्र वानखेडे, दीपक कांबळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन मंचाचे अध्यक्ष प्रा. राजेश डंभारे यांनी केले आहे. या स्पधेर्चे आयोजन यशस्वी करण्यासाठी परिवर्तनधारा साहित्य कला मंचाचे जीवनप्रकाश निमसडकर, चरण गायकवाड, सुभाष चंदनखेडे, डॉ. हरीश पेटकर, प्रकाश कांबळे, मुकुंद नाखले, सुनील ढाले, सचिन ताकसांडे, प्रशांत जारोंडे, अरुण भोंगाडे, प्रियांशू पाटील, जगदीश ढुमणे, विक्रम म्हैस्के, शुभम उईके, यशवंत म्हात्रे, कैलास भगत आदी पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहे.

## मराठा सेवा संघाचे नवे जिल्हाध्यक्ष वीरेंद्र कडू

### मराठा सेवा संघ राज्यस्तरीय निवड समिती द्वारा सवार्नुमते निवड



**लोकशाही वार्ता/वर्धा**

मराठा सेवा संघाच्या राष्ट्रीय धोरणानुसार संपूर्ण देशांतर्गत राज्य, जिल्हा व तालुकास्तरीय कार्यकारणींचे पुनर्गठन करण्यासाठी मराठा सेवा संघाचे महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष अरविंद गावंडे यांच्या अध्यक्षतेत ९ सदस्यीय निवड समितीची स्थापना करण्यात आली.

सदर समितीने पहिल्या टप्प्यात नागपूर व अमरावती विभागासह विदभार्तील ११ जिल्ह्यांची जिल्हा कार्यकारणी पुनर्गठीत करण्यासाठी २ जुलै ते ७ जुलै पर्यंत दौरा आयोजित केलेला आहे.

त्या अनुषंगाने ५ जुलै रोजी दुपारी ४ वाजता शासकीय विश्रामगृह वर्धा येथे जिल्ह्यांतर्गत सर्व आजी माजी जेष्ठ पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सवार्नुमते मराठा सेवा संघाचे निष्ठावंत व अभ्यासू कार्यकर्ते वीरेंद्र कडू यांची जिल्हाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. अभ्यासू लेखक म्हणून वीरेंद्र कडूंची राज्यात ओळख आहे. मराठा सेवा संघाचे संस्थापक पुरुषोत्तम खेडेकर आणि राज्य निवड समितीने कडू यांच्या कायार्बाबत आनंद व्यक्त केला. सभेत निवड समिती द्वारा जिल्हा उपाध्यक्ष एड. अरुण येवले, किरण देशमुख, प्रमोद भेंडे, जिल्हा सचिव ॲड. कपिलवृक्ष घोडघाटे, सहसचिव प्रमोद भोयर व जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून अमर देशमुख यांची निवड करण्यात आली आहे. मार्गदर्शक सुधीर गीऱ्हे, ॲड. नंदकुमार वानखडे, मयुर डफळे यांची सदस्य म्हणून तर सुनिता सुरेंद्र जाणे जिजाऊ ब्रिगेड व पंतुसिंग जाधव यांची आर्वी तालुक्यासाठी निवड करण्यात आली. निवड समिती प्रमुख अरविंद गावंडे यांनी प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले. यावेळी नारायणराव रोंघे, अशोक वेले, मंगेश जगताप, रवींद्र घाडगे, नरेश निनावे, वैभव निखाडे, राजू वानखडे, सुनिता इंगळे, वैशाली गीऱ्हे आदींची उपस्थिती होती.

## तीन महिन्यांपासून रुग्णवाहिका वाहन चालकांचे वेतन थकीत

### १०२ रुग्णवाहिकांवर कार्यरत जिल्ह्यातील जवळपास ३२ चालकांची वेतनाअभावी आर्थिक अडचण



**लोकशाही वार्ता/वर्धा**

तातडीच्या प्रसंगी रुग्णांना उपचार मिळण्याकरिता रुग्णवाहिका चालक अहोरात्र कर्तव्य बजावतात. मात्र, तीन महिन्यांपासून १०२ रुग्णावाहिकांवर कार्यरत असलेल्या वाहनचालकांना वेतन मिळालेले नाहीत. त्यामुळे वाहनचालकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. वाहनचालकांचे वेतन करावे, अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून देण्यात आला आहे.

मागील दहा ते पंधरा वषार्पासून शासकीय रुग्ण वाहिकेवर विविध कार्यप्रणालीद्वारे अल्पशः मानधनावर २४ तास अहोरात्र आरोग्य संस्थेवर रुग्णवाहिका चालक कर्तव्य बजावत आहेत. परंतु शासन व प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप होत आहे. मागील तीन माहिन्यापासून वेतन न मिळाल्यामुळे आर्थिक स्थिती विस्कटली आहे. परिवारावर उपासमारीची वेळ आली आहे. मुलांची शाळा सुरु झाल्यामुळे शाळेची फी, पुस्तके घेण्यासाठी पैसे नसल्यामुळे शिक्षणाचा प्रश्न उद्धवला आहे.

अत्यावश्यक बाबीकरिता लागणारा आर्थिक खर्च वेतन न झाल्यामुळे प्रचंड अडचणी वाढल्या आहेत. मागील तीन महिन्याचे थकीत असलेले वेतन एकत्रित त्वरित देण्यात यावे.

दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत नियमित वेतन वाहन चालकांना अदा करण्यात यावे. एनआरएचएम कर्मचाऱ्यांप्रमाणे १० वर्ष जास्त सेवा झालेल्या कर्मचारी समायोजनाप्रमाणे एनआरएचएमअंतर्गत नियुक्तीने ३ ते ४ वर्ष सेवा बजावून शासनाने बाह्य स्त्रोत संस्थेस कंत्राट दिल्यामुळे कार्यरत असलेले वाहन चालकांचा शासन सेवेत समायोजन करण्यात यावे, समान काम समान वेतन त्वरित लागू करण्यात यावे व फरकाची स्वकम देण्यात यावी आदी मागण्यांचे निवेदन अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे.

याबाबत निधी आल्याबरोबर वेतन देण्यात येईल, अशी प्रतिक्रिया अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

गुड मॉर्निंग

लोकशाही वार्ता

# अकोला-वाशीम

नागपूर, सोमवार, १४ जुलै २०२५/१०

epaper.lokshahivarta.in | lokshahivarta | lokshahivarta | DailyLokshahiVarta


## सर्पदंशामुळे तरुणाचा मृत्यू

**भंडारा :** सर्पदंश झाल्याने उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या तरुणाचा मृत्यू झाला. निखिल लंकेश्वर बागडे (३०, रा. घोगरा, ता. तिरोडा, जि. गोंदिया) असे मृतकाचे नाव आहे. निखिलला सर्पदंश झाल्याने सुबोध हॉस्पिटल, तुमसर येथून सामान्य रुग्णालय, भंडारा येथे आणण्यात आले. मात्र, रुग्णालयात दाखल केल्यानंतर तपासणीनंतर डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# शिक्षकांना मिळणार वाढीव अनुदान टप्पा


## आ. किरण सरनाईक यांनी केला पाठपुरावा

**लोकशाही वार्ता/वाशीम**

विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनुदानाचा वाढीव टप्पा देण्याचे शासनाने जाहीर केले आहे. अनुदान टप्पावाढीचा शासन निर्णय निर्गमित होऊन पात्र शाळांना अनुदान टप्पा जाहीर करण्यात आला. विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना यामुळे आनंद झाला होता. मात्र हा निर्णय अमलात केव्हा येईल, याची प्रतीक्षा सुरू होती.

शिक्षक समन्वय संघाच्यावतीने शिक्षकांनी आझाद मैदान येथे हुंकार आंदोलन सुरू केले. नंतर महाराष्ट्रातील सर्व शाळा बंद आंदोलन केले. अखेर या आंदोलनाला यश आले आहे.

शिक्षक आमदार किरण सरनाईक यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी लावून, तसेच सध्या सुरू असलेल्या



पावसाळी अधिवेशनातही लक्षवेधी प्रश्नाद्वारे शासनाला जाब विचारला होता. त्याशिवाय पुरवणी मागण्यातील चर्चेमध्ये, अनुदान टप्पावाढीचा सतत पाठपुरावा केला होता. या प्रयत्नाला यश आले असून, हक्काचा अनुदानाचा वाढीव टप्पा सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मिळणार आहे.

आझाद मैदान येथे मंत्री गिरीश महाजन यांनी ही माहिती दिली. आ. सरनाईक यांनी शिक्षक समन्वय संघाच्या सर्व लढवय्या शिलेदारांचे अभिनंदन केले असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले आहेत. यावेळी ज्ञानेश्वर म्हात्रे, विक्रम काळे, किशोर दराडे व हजारोच्या संख्येने विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शिक्षक उपस्थित होते.

# कत्तलीसाठी गोवंश नेणाऱ्या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

## बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी पकडले वाहन

**लोकशाही वार्ता/वाशीम**

मानोरा तालुक्यातील पोहरादेवी बिट अंतर्गत उमरी ते शेंदोणा रोडवर वाहनात गोवंश भरून पुसदकडे कत्तलीसाठी घेऊन जात असताना या तस्करांना बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी पकडले. लोभीवंत जाधव यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी तीन आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

उमरी, शेंदोणा व पोहरादेवी येथून दिग्रसमधील गोवंशाची कत्तल करणारे काही व्यापारी दलालांमार्फत खरेदी करतात. रात्रीच्या सुमारास अंधाराचा फायदा घेत गावातून घेऊन जातात. ही माहिती पोहरादेवी येथील बंजरंग दलाच्या कार्यकर्त्यांना मिळाली होती. या गुप्त माहितीच्या आधारे यावर पाळत ठेवून होते.



याचदरम्यान, बंजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी पोलिस स्टेशन मानोरा येथे संपर्क साधला. एम एच २९ बी इ ३९६१ या टाटा वाहनाने पुसदकडे गोवंश नेत असल्याची माहिती प्रशासनाला दिली. बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी वाहन अडवून, मानोरा स्टेशनला जमा केले. पोलिसांनी आरोपी फिरोज मिरावाले, इम्रान अलीमवाले व रमजान मिरावाले राहणार याच्यांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला.

# विदर्भातील मुख्याध्यापकांच्या समस्या सोडविणार

## शिक्षण राज्यमंत्री ना. भोयर यांचे आश्वासन : मुख्याध्यापक भवन निर्माण करणार



**लोकशाही वार्ता/अकोला**

शिक्षण क्षेत्रात अनेक समस्या असून, विदर्भ मुख्याध्यापक संघाने सांगितलेली एकही समस्या शिल्लक राहू देणार नाही, तसेच विदर्भामध्ये मुख्याध्यापक संघाचे भवन निर्माण करण्यास पुढाकार घेईल, असे आश्वासन राज्य शिक्षण मंत्री ना. पंकज भोयर यांनी विदर्भ मुख्याध्यापक संघाच्या कार्यक्रमात वर्धा येथे केले.

अध्यक्षस्थानी अखिल महाराष्ट्र मध्य उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळाचे अध्यक्ष रावसाहेब आवारे, तर प्रमुख अतिथी म्हणून आ. केअरभाऊ ढोमसे, शत्रुघ्न बिडकर, सतीश जगताप, विलास भारसाकडे, बळीराम झांबरे, मंदा उमाटे होते.

याप्रसंगी विदर्भ अध्यक्ष सतीश जगताप यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विलास खूमकर, बळीराम जांभळे, विजय ठोकळ, दिनेश तायडे, दीपक बिरकड आदी उपस्थित होते.

# शेंदूरजना येथे स्मशानाअभावी मरणानंतरही यातना

**लोकशाही वार्ता/वाशीम**

मानोरा तालुक्यातील शेंदूरजना आढाव येथे आजही अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमी नसल्याने नागरिकांना मरणयातना भोगावी लागत आहे. तालुक्यात मागील दहा दिवसांपासून पावसाच्या सरी कोसळत असल्याने सूर्यदर्शन दुर्लभ झाले आहे. रात्री गोरसिंग पवार यांची अल्पशा आजराने निधन झाले होते. अंत्यविधी सकाळी ७ वाजता ठरविण्यात आला होता. गावाला स्मशानभूमी नसल्याने उपस्थितांना थांबावे लागले. त्यानंतर पावसामुळे अंत्यविधी पावसातच करावा लागले. पाण्यामुळे लाकडेसुद्धा पेट घेत नव्हती. त्यामुळे २० लिटर डिझेल आगीत ओतून अंत्यविधी करावा लागले. ही गावासाठी शोकांतिका असल्याने या गंभीर बाबीकडे लक्ष देऊन स्मशानभूमी उभारण्यासाठी लोकप्रतिनिधी व प्रशासनाने दखल घेण्याची मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

# इनरव्हील क्विन्सच्या नवीन चमूचे पदग्रहण

**लोकशाही वार्ता/अकोला**

सामाजिक व मानवीय सेवा कार्यात सेवारत इनरव्हील क्लब ऑफ अकोला क्वीनच्या नूतन कार्यकारणीचा पदग्रहण सोहळा नुकताच पार पडला. कृष्णा हेरिटेज येथे झालेल्या या सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून रश्मी शर्मा, डॉ. आशा तारे, विणा वाघेला, रुची रुहाटीया, कविता पोहरे होत्या. या सोहळ्यात मावळत्या अध्यक्ष रुची रुहाटीया यांच्याकडून नूतन अध्यक्ष कविता पोहरे यांनी पदभार स्वीकारला.



नूतन कार्यकारिणीत अध्यक्ष कविता पोहरे, सचिव स्वीटी राठी, रुची रुहाटीया, उपाध्यक्ष पल्लवी दिवेकर, कोषाध्यक्ष दीपिका शाह, आयएसओ हरसिमरन जुनेजा, सीसी अंकिता सोनी, कार्यकारणी सदस्य म्हणून- वनिशा अलीमचंदानी, नियती आयदासानी, पूजा वाकरे, राणी ठाकूर, दीप्ती अग्रवाल कामकाज बघणार आहेत.

यावेळी क्लबमधील नवीन सदस्य दीप्ती अग्रवाल, पूनम गोयनका, काव्या मनवाणी, डॉ नम्रता भागवत आदींचा सत्कार करण्यात आला. नियती आयदासानी व प्रिया भागवानी यांनी संचालन केले. या सोहळ्यात पीपी तेजल मेहता, दीपाली वर्मा यांचेसमवेत इनरव्हील अकोला व नॉर्थ क्लबचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# शिर्डी येथील पुजारी प्रशिक्षण शिबिरासाठी साईश्रद्धा संस्थांनला निमंत्रण

## राजू डांगे पुजारी प्रशिक्षणासाठी रवाना

**लोकशाही वार्ता/वाशीम**

श्री साईबाबा संस्थान शिडीर्शी संलग्न असलेल्या देशभरातील, तसेच इतर देशातील साई मंदिरातील पुजाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी शिर्डी येथे सहा दिवशीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी शेलुबाजार येथील साईश्रद्धा संस्थांनचे पुजारी राजू डांगे हे शिर्डी येथील पुजारी प्रशिक्षण शिबिरासाठी रविवारी रवाना झाले. दि. १४ ते १९ जुलै या कालावधीत हे प्रशिक्षण शिबिर होणार आहे.

देश-विदेशात श्री साईबाबांच्या मंदिरांच्या संख्यामध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. या सर्व मंदिरांमध्ये व साईभक्तांमध्ये राबविलेल्या पद्धती आणि प्रणाली यामध्ये एकसुत्रीपणाचे अनुसरण असणे आवश्यक आहे. याकरिता देशभरात साई मंदिरांच्या पुजाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची मागणी लक्षात घेऊन श्री साईबाबा संस्थान, शिर्डीतर्फे प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.



# खतांवरील खर्च कमी करण्यासाठी केंद्रीयमंत्री गडकरी यांच्यासमोर सादरीकरण

**लोकशाही वार्ता/वाशीम**

शेतकऱ्यांचा खतांवरील खर्च कसा कमी होऊ शकतो, याचे सादरीकरण कृषी संशोधक डॉ. संतोष चव्हाण यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्यासमोर नुकतेच केले. ना. गडकरी यांची त्यांच्या नागपूर येथील निवासस्थानी भेट घेऊन त्यांना याबाबत माहिती देण्यात आली. या भेटीत फार्मर्स लॅबोरेटरी या संकल्पनेबाबत मालेगावचे कृषी संशोधक डॉ.संतोष चव्हाण यांनी सादरीकरण केले.

या भेटीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आस्थापूर्वक माहिती समजून घेऊन, सविस्तर चर्चा केली.

सदर प्रकल्पाची अंमलबजावणी झाल्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळून त्यांचा खर्चात बचत होईल, याबाबत कृषी संशोधक डॉ. संतोष चव्हाण यांनी समाधान व्यक्त केले.

# चिल्ड्रन इस्लामिक ऑर्गनायझेशनच्या बालकांची वृक्षारोपण मोहीम




**अकोला -** जमाते इस्लामी हिंदची बालक शाखा असणारी चिल्ड्रन इस्लामिक ऑर्गनायझेशन संपूर्ण देशभर पर्यावरणपूरक अभियान राबवित असून, देशभरात या संस्थेची बालके एक लाख झाडांचे वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करणार असल्याची माहिती, चिल्ड्रन इस्लामिक ऑर्गनायझेशनच्यावतीने शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.

'हात मातीत, मन देशासोबत', या संकल्पनेवर आधारित हे पर्यावरण बचाव अभियान देशभरातील बालकांनी प्रारंभ केले असून, ते २६ जुलैपर्यंत राबविल्या जाणार आहे.

बालकांमध्ये निसर्गप्रेम, जबाबदारी व सेवाभाव निर्माण व्हावा, वृक्षांप्रती आवड निर्माण व्हावी या उदात्त हेतूने हे अभियान साकारण्यात आले आहे. पत्रपरिषदेस डॉ. उरूज अहमद, अब्दुल नईम, अफीफा खानम, नदीम, अजरा यास्मीन, तंजीला फातेमा, आयशा सिद्दीका, मोहम्मद अली, आयजा फातेमा, अनस खान, मजहर फारुख, अब्दुल अदनान, सय्यद उमर, तंजीला अंसारी, मुबश्शिरा अंसारी, आरुज फातेमा आदी उपस्थित होते.

# १५ जुलैपासून पुन्हा सुरू होणार डीईएमयू ट्रेन



**भंडारा :** गेल्या १५ महिन्यांपासून बंद असलेली तुमसर रोड - बालाघाट डीईएमयू ट्रेन सेवा १५ जुलै पासून पुन्हा सुरू होत आहे. दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, बिलासपूरच्या प्रिन्सिपल चिफ ऑपरेटिंग मॅनेजर यांनी याबाबत अधिकृत घोषणा केली आहे.

ही ट्रेन तुमसर रोडवरून तुमसर टाऊन, गोबरवाही, तिरोडी, कटंगी व वारासिवनीमार्गे बालाघाटपर्यंत जाईल. परतीच्या मार्गात ती बालाघाटहून तिरोडी, गोबरवाही मार्गे तुमसररोड येथे येईल. या सेवेला पुन्हा सुरुवात होणार असल्याने तुमसर, गोबरवाही, डोंगरी बुजुर्ग परिसरातील नागरिकांत आनंदाचे वातावरण आहे.

# ई-केवायसी न केल्यास धान्य मिळणे होणार बंद

## तात्काळ ई-केवायसी करण्याचे आवाहन

**लोकशाही वार्ता/तुमसर**

सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत शिधापत्रिकाधारकांना अनुदानित दरात धान्य वितरित केले जाते. मात्र, आता ई-केवायसी न केलेल्या शिधापत्रिकाधारकांना धान्य मिळणे बंद होणार असल्याचे अन्न व नागरी पुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे. तुमसर तालुक्यातील सरकारी स्वस्त धान्य दुकानातून अन्नधान्याचा लाभ घेणाऱ्या शिधापत्रिका धारकांना रेशन दुकानात ई- केवायसी प्रक्रिया करणे अनिवार्य होते. याकरिता पुरवठा विभागाद्वारे वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे.

# शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंतांचा सत्कार

**लोकशाही वार्ता/वाशीम**

शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंतांचा सत्कार एसएमसी इंग्लिश स्कूल येथे नुकताच पार पडला. पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेची गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर करण्यात आली.

एसएमसी इंग्लिश स्कूल, वाशीम येथील विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट झाले होते. यामध्ये इयत्ता पाचवीतील मोक्षदा चांदजकर, रिधीका मोरे, आयुष सुरटकर, प्रांजल ठाणे यांनी गुणवत्ता यादीत येऊन यश प्राप्त केले. आपल्या यशाचे श्रेय त्यांनी प्राचार्य मीना उबगडे, शिक्षक अभिजीत जोशी यांना दिले. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे व माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालय, वाशीम



यांच्या संयुक्त विद्यमाने पाचवी व इयत्ता आठवीसाठी पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेची आयोजन दरवर्षी करण्यात येते. सत्कार सोहळ्यास प्रा. हरिभाऊ क्षीरसागर, प्रा, गजानन वाघ, अनंत पंडितकर आदी उपस्थित होते.

# वन अधिकारी मेश्राम यांना भावपूर्ण निरोप

**लोकशाही वार्ता/मंगरूळपीर**

मंगरूळपीर येथे कर्तव्यदक्ष वनपरिक्षेत्र अधिकारी बी. एम. मेश्राम हे गेली चार वर्षे वनविभागात वनपरिक्षेत्र अधिकारी म्हणून कार्यरत होते. नुकतीच यवतमाळ जिल्ह्यात वखार महामंडळ अधिकारी म्हणून त्यांची बदली झाली. त्यांना एका समारंभात भावपूर्ण निरोप देण्यात आला.

मंगरूळपीर तालुक्यात कार्यरत असताना विविध प्रकारचे शासनाचे उपक्रम त्यांनी मोठ्या तयारीने राबविले. वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करणे, शेताच्या बांधावर किंवा पडीक जमिनीवर वृक्ष लागवडीचा लाभ देणे, हरित



महाराष्ट्र या संकल्पनेनुसार, राष्ट्रीय हरित सेनेमार्फत शालेय स्तरावर विविध कार्यक्रम घेणे असे विविध उपक्रम त्यांनी आपल्या कारकिर्दीत राबविले. निरोप समारंभास सुबोध वंजारे, संतोष मुंडे, समाधान वानखडे आदी उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले युनेस्को यादीत आल्याने भाजपचा जल्लोष

**लोकशाही वार्ता/वाशीम**

छत्रपती शिवाजी महाराज यांचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा असलेले १२ गड-किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झाल्याने भारतीय जनता पार्टीच्यावतीने जल्लोष करण्यात आला. संपूर्ण शहरात शिवप्रेमी, नागरिक, कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन अभिमानाने आणि आनंदाने या ऐतिहासिक क्षणाचा उत्सव साजरा केला. यावेळी महाराष्ट्र राज्याचे मंत्री संजय राठोड, आ. श्याम खोडे यांची विशेष उपस्थिती लाभली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे हे यश असून, २०१४-१५ मध्ये मुख्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर त्यांनी छत्रपतींच्या गड-कोटांना जागतिक वारसा दर्जा



मिळवून देण्याचा संकल्प व्यक्त केला होता. राज्य सरकार, पुरातत्त्व विभाग यांच्या पाठपुराव्याने युनेस्कोने छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले जागतिक वारसा यादीत समाविष्ट केल्याची घोषणा केली, हे विशेष.

या ऐतिहासिक निर्णयामुळे संपूर्ण महाराष्ट्राचा, विशेषतः शिवप्रेमींचा ऊर अभिमानाने भरून आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे प्रेरणास्थान आहेत, आणि आम्ही त्यांच्या गडकोटांचा केवळ गौरव केला आहे, राजकारण नाही, असे भावनिक उद्‌गार आ. श्याम खोडे यांनी काढले, यावेळी पुरुषोत्तम चितलांगे, मनीष मंत्री, गजानन मेसरे, गणेश गायकवाड, तसेच भाजपा पदाधिकारी, युवा मोर्चा, महिला मोर्चा, शिवप्रेमी, हिंदवी स्वराज्य परिवार, शिव प्रतिष्ठान, बजरंग दल, विश्व हिंदू परिषद आणि विविध हिंदुत्ववादी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## मनपाची प्लास्टिक जप्ती मोहीम कार्यवाही

**लोकशाही वार्ता/अमरावती**

१० जुलै २०२५ रोजी मध्य झोन क्र.२, राजापेठ अंतर्गत सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर यांच्या उपस्थितीत कॉटन मार्केट, चौधरी चौक परिसरात प्लास्टिक वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली.या मोहिमेदरम्यान, परिसरातील फुलविक्रेत्यांकडून मोठ्या प्रमाणात प्लास्टिक जप्त करण्यात आले असून, संबंधित विक्रेत्यांना सक्त ताकीद देण्यात आली. तसेच, हातगाडीधारकांना डस्टबिन ठेवणे आवश्यक असल्याचे निर्देश व नोटिसा देण्यात आल्या.




लोकशाही वार्ता
अमरावती
नागपूर, सोमवार, १४ जुलै २०२५/ ११

## साहित्य संमेलन अध्यक्ष डॉ. रा.गो चवरे यांचा सत्कार

**लोकशाही वार्ता/अमरावती**

परिवर्तन प्रबोधनीच्या दुसऱ्या राज्यस्तरीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष थोर साहित्यिक व विचारवंत प्राचार्य डॉ. रा.गो. चवरे यांचा डॉ. गोविंद कासट मित्रमंडळीने सत्कार केला. कांचन लोन येथे आयोजित भव्य दिव्य उद्घाटन सत्कार व पुस्तक प्रकाशित इत्यादी कार्यक्रमानंतर आजपासून ४०-४५ वर्षांपूर्वी साहित्यिक वक्ता कबड्डी प्रशिक्षक कथाकथनकार प्राचार्य डॉ. सतीश तराड सोबत भेटीगाठी झालेले डॉ. रा. गो. चवरे यांच्यासोबतच्या जुन्या आठवणी ताज्या केल्या.

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

### दृष्टिक्षेप

## माजी महापौर चेतन गावंडे यांचे मनपा आयुक्तांना निवेदन

**लोकशाही वार्ता/अमरावती**

अमरावती नरखेड रेल्वे लाईन करिता मौजे अकोली येथील मनपाच्या मालकीच्या भूखंडाचे भूसंपादन रेल्वे विभागाकडून करण्यात आले होते. मात्र, भूसंपादित करण्यात आलेल्या भूखंडाचा मोबदला रेल्वे विभागाकडून अप्राप्त असल्यामुळे सदर भूखंडाच्या अभिन्यासामधील विकासकामे अजूनपर्यंत करण्यात आली नाही. करिता भूसंपादित केलेल्या भूखंडाचा मोबदला रेल्वे विभागाकडून प्राप्त करून संबंधित अभिन्यासामधील विकासकामे तत्काळ करावे. अशी मागणी माझी महापौर चेतन गावंडे यांनी मनपा आयुक्तांना निवेदनाद्वारे केली आहे. अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील साईनगर प्रभाग १९ अंतर्गत येणाऱ्या मौजे अकोली सर्वे क्रमांक ३/२ व १६ एकूण क्षेत्रफळ ६४८ चौ. मी., सर्वे क्रमांक २७/१ एकूण क्षेत्रफळ १८० चौ. मी. , सर्वे क्रमांक ३१/३ एकूण क्षेत्रफळ १२९६ चौ. मी . विशेष भूसंपादन अधिकारी लघु सिंचन कामे अमरावती यांच्याकडून भूसंपादन करण्यात आले होते. या भूखंडाचा मोबदला मिळण्याबाबत अनेक पत्र व्यवहार झाला, परंतु अजूनपर्यंत भूसंपादित भूखंडाचा मोबदला महानगरपालिकेला मिळाला नाही. वरील भूखंड महानगरपालिकेत अभिनया सामधील विकास खचापीटी मिळाले होते . सदर भूखंडाचा मोबदला मिळाल्यास अभिन्यासामधील विकास विकास कामे करणे शक्य होईल. करिता लवकरात लवकर मोबदला मिळण्याबाबत कारवाई करण्याची मागणी माझी महापूर चेतन गावंडे यांनी निवेदनातून केली आहे.

## शासकीय आयटीआय येथे आज भरती मेळावा

**लोकशाही वार्ता/अमरावती**

अमरावती शासकीय औद्यागिक प्रशिक्षण संस्थेतील येथील एनएसएस हॉलमध्ये दि. १४ जुलै रोजी, सकाळी १० वाजता प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या भरती मेळाव्यामध्ये तसेच अमरावती जिल्ह्यातील स्थानिक नामांकित कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहे. आय टी आय उत्तीर्ण नोकरी, इच्छुक विद्यार्थ्यांनी या मेळाव्यात उपस्थित रहावे, असे आवाहन सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार अपर्णा आगरकर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.भरती मेळाव्यात फिटर, वायरमन टर्नर, मशिनिस्ट, वेल्डर, इलेक्ट्रिशियन, कारपेन्टर, इलेक्ट्रॉनि क्स, डिझेल मेकॅनिक, आणि मोटर मेकॅनिक, आय टी आय व्यवसाय उत्तीर्ण तसेच १० वी, १२ वी उत्तीर्ण उमेदवार, प्रशिक्षणार्थीनी यांनी बायोडाटा व मूळ कागदपत्राच्या छायांकीत प्रतीसह सहभागी व्हावे. या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार, औद्यागिक प्रशिक्षण संस्था, अमरावती यांनी केले आहे.

# महामार्गावरील बार आणि रेस्टॉरंटला मध्यरात्रीपर्यंत परवानगी कुणाची?

### पोलिस यंत्रणेचा वचक राहला नाही, हत्येच्या घटनेने शासकीय यंत्रणेवर शंका

**लोकशाही वार्ता/नांदगाव पेठ**

राष्ट्रीय महामार्गावरील हॉटेल्स, बार आणि रेस्टॉरंटला रात्री ११ वाजेपर्यंतच पोलीस विभागाची परवानगी असतांना नांदगाव पेठ हद्दीत येणाऱ्या हॉटेल्स, बार आणि रेस्टॉरंटला मध्यरात्रीपर्यंत कुणाची परवानगी आहे असा प्रश्न शनिवारी झालेल्या राजकुमार सुंदरानी यांच्या हत्येच्या घटनेमुळे निर्माण झाला आहे.पोलीस विभागावर नेमके दडपण कुणाचे आहे हे समजायला अवघड असून राजकीय नेत्यांच्या बार अँड रेस्टोरेन्टला मध्यरात्री ३ ते ४ वाजेपर्यंत मुभा दिली जात असेल आणि त्याठिकाणी गुंड प्रवृत्तीचे लोक येऊन शहराची शांतता आणि सुव्यवस्था बिघडवत असेल तर याला जबाबदार कोण हा यक्षप्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतो आहे.

आषाढी एकादशीच्या दिवशी राज्यात ड्राय डे घोषित असताना महामार्गालगत असलेल्या न्यू किशन बार अँड रेस्टॉरंटमधून दिवसभर खुलेआम दुप्पट भावाने मद्यविक्री सुरू होती. रात्री साडे नऊ वाजता संबंधित प्रकारची माहिती पोलिस प्रशासनाला देण्यात आल्यानंतर एका तासात नांदगाव पेठ पोलिसांनी त्या बार वर धाड टाकली तेव्हा असा कोणता प्रकार झालाच नाही, शांतता आहे असा पोलिसांकडून फोटो सह वरिष्ठांना अहवाल जाणे ही बाब खेदजनक असून अशा लपवालपवी मुळेच एस.ए. इम्पेरियल बार अँड रेस्टॉरंट समोर मध्यरात्री साडे तीन वाजता हत्येसारखा प्रकार घडतोय याला कुठेतरी पोलिस प्रशासन जबाबदार असल्याचे बोलले जात आहे. दहा दिवस उलटूनही न्यू किशन बार अँड रेस्टॉरंट आणि येथून फुकट मद्याची बॉटल घेऊन जाणारे पोलिस कर्मचारी यांच्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही हे विशेष! त्या दिवशी कार्यवाही झाली असती तर आज कदाचित ही दुर्दैवी घटना घडली नसती. महामार्गावरील असे अनेक हॉटेल्स, बार अँड रेस्टॉरंट आहेत जेथे रात्री ग्राहक कितीही वाजता गेले तरी मागच्या दाराने आतमध्ये घेतात. आणि मद्य व जेवणाची सुविधा पुरवितात. नेत्यांच्या हॉटेल्स ला वेगळे नियम आहेत आणि तेच रस्त्यांवरील पोटाची खळगी भरणारे लहान सहान हॉटेल्स आहेत त्यांना मात्र, दहा वाजता कडक शिट्टी मारून पोलिस कर्मचारी घड्याळाची वेळ इशाऱ्याने दाखवत डोळे वटारून हॉटेल्स बंद करण्याचा आदेश देतात हे तरी कितपत योग्य आहे असा प्रश्न खऱ्या अर्थाने निर्माण होत आहे. नांदगाव पेठला नव्याने लाभलेले पोलिस निरीक्षक दिनेश दहातोंडे हे अतिशय शिस्तप्रिय, कायद्याची कडक अंमलबजावणी करणारे आणि जनतेच्या सुरक्षेसाठी झटणारे अशी त्यांची पूर्वीची ओळख आहे त्यामुळे त्यांच्याकडून नांदगाव पेठ हद्दीतील नागरिकांना भरपूर अपेक्षा असून यापुढे हद्दीत बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्यांवर तसेच कायद्याचे उल्लंघन करणा ऱ्यांवर खाकी वर्दीचा दंडुका बसला पाहिजे तरच हद्दीत आणि पयार्याने शहरात शांतता आणि सुव्यवस्था निर्माण होईल, यात शंका नाही

## शाळाबाह्य विद्यार्थ्यांना प्रवाहात आणण्यासाठी वर्षभर मोहीम

### जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे निर्देश

**लोकशाही वार्ता/अमरावती**

जिल्ह्यात एकही मूल शिक्षणापासून वंचित राहणार नाही, यासाठी शाळाबाह्य, अनियमित आणि स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आता वर्षभर विशेष मोहीम राबवली जाणार आहे. या संदर्भात, शाळाबाह्य विद्यार्थी जिल्हा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीची बैठक नुकतीच पार पडली.

मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्यासह जिल्हा पोलीस अधीक्षकांचे प्रतिनिधी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य, महिला व बालविकास अधिकारी, समाज कल्याण अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, समग्र शिक्षाचे जिल्हा समन्वयक, तसेच माध्यमिक व प्राथमिक शिक्षणाधिकारी यावेळी उपस्थित होते. प्रत्येक घरोघरी, बस स्थानके, रेल्वे स्थानके, हॉटेल्स, खानावळी, सार्वजनिक ठिकाणे, बाजारपेठा, वीटभट्ट्या आणि शेतशिवारात जाऊन शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घ्यावा. मुख्याध्यापकांनी स्थलांत राची संभाव्य जागा आणि प्रवेशाची माहिती दप्तरी नोंदवून ठेवावी. या सर्वेक्षणात स्वयंसेवी संस्थांनी मदत करावी, तसेच माध्यमिक विभागाने १८ वर्षांपर्यंतच्या मुलींना शिक्षण प्रवाहात ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत. सर्वेक्षण केवळ ठराविक कालावधीत न करता, वर्षभर ही प्रक्रिया चालू ठेवावी, जेणेकरून एकही मूल शिक्षणाविना राहणार नाही, असे निर्देश जिल्हाधिकारी येरेकर यांनी दिले.

## योगशिक्षक संघाद्वारे गुरुपौर्णिमा उत्सव उत्साहात साजरा

**लोकशाही वार्ता/अंजनगाव सुर्जी**

येथील लढ्ढा कॅम्पस, महेशनगर मधील मानवसेवा पॅरामेडिकल कॉलेज मध्ये महाराष्ट्र योगशिक्षक संघाद्वारें गुरुपौर्णिमा ११ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता साजरी करण्यात आली. यावेळी सर्वप्रथम महर्षी पतंजली ऋषींच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. त्यानंतर सर्व पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र योगशिक्षक संघाचे अमरावती जिल्हाध्यक्ष डॉ नंदकिशोर पाटील उपस्थित होते.

प्रमुख अतिथी म्हणून कोषाध्यक्ष डॉ अक्षय चौधरी, विशेष निमंत्रीत सदस्य भास्करराव बोंद्रे, योगशिक्षक डॉ चेतन भागवत, चित्रपट दिग्दर्शक संतोष खवले उपाध्यक्ष प्रिया पाटील, गीता येऊल, साक्षी पाटील, सचिव सारिका धामोळे, अक्षय धुळे, सोशल मीडिया प्रभारी डॉ. मोहन नेसनेसकर, महिला प्रकोष्ठ प्रभारी रेणुका बोरोडे, दिव्या मुरकुटे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ मोहन नेसनेसकर यांनी केले. त्यांनतर डॉ अक्षय चौधरी यांनी गुरूपौर्णिमा निमित्त गुरूचे महत्त्व विषद केले. योगशिक्षक भास्करराव बोंद्रे यांनी लेखिका निधी धांडे हिचे कौतुक केले. सौ गीता येऊल यांनी गुरुपौर्णिमाविषयी भाषण केले. फिल्म डायरेक्टर संतोष खवले यांनी गुरूपौर्णिमानिमित्त उत्कृष्ठ भाषण केले. डॉ. चेतन भागवत यांनी संकल्प घेतला आणि योगासन स्पर्धा संधींचे मागदर्शन केले. त्यानंतर डॉ नंदकिशोर पाटील यांनी गुरू परंपरा, वेद पुराण, योगातील ग्रंथ घेरंड सहिता, हटयोग, पतंजली योग सूत्र विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

## खरीप हंगामासाठी राज्यस्तरीय पीकस्पर्धा जाहीर; शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन

**लोकशाही वार्ता/अमरावती**

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने खरीप हंगाम २०२५ साठी राज्यस्तरीय पीकस्पर्धेचे आयोजन केले असून, या माध्यमातून प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देऊन राज्याच्या कृषी उत्पादकतेत वाढ करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या स्पर्धेत भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग आणि सूर्यफूल या ११ प्रमुख पिकांचा समावेश आहे.

मूग आणि उडीदसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ जुलै २५ असून, इतर पिकांसाठी ३१ ऑगस्ट २५ पर्यंत मुदत आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, राहुल सातपुते यांनी केले आहे.स्पर्धेसाठी सर्वसाधारण गटाला प्रति पीक ३०० रुपये तर आदिवासी गटाला १५० रुपये प्रवेश शुल्क आकारले जाईल. भात पिकासाठी किमान २० आर आणि इतर पिकांसाठी ४० आर (१ एकर) क्षेत्रावर सलग लागवड असणे बंधनकारक आहे. ही स्पर्धा तालुकास्तरावर आयोजित केली जाईल आणि विजेत्यांना राज्य, जिल्हा व तालुका पातळीवर आकर्षक रोख बक्षिसे दिली जातील. तालुका पातळीवर ५,००० रुपये, जिल्हा पातळीवर १०,००० रुपये, तर राज्य पातळीवर ५०,००० रुपयांपर्यंतचे पहिले बक्षीस मिळेल. इच्छुक शेतकऱ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज, शुल्क भरल्याचे चलन, ७/१२ उतारा, जात प्रमाणपत्र (आदिवासी असल्यास), पिकाच्या क्षेत्राचा नकाशा आणि बँक पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत या कागदपत्रांसह संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करावा.

## येवदा प्रा.आ.केंद्राची जागा ग्रामीण रुग्णालय बांधकामासाठी हस्तांतरित; सीईओकडून मंजुरी

**लोकशाही वार्ता/दर्यापूर**

तालुक्यातील येवदा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची जागा ग्रामीण रुग्णालय बांधकामासाठी हस्तांतरित करण्यात आली आहे.

तसे आदेश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी जिल्हा शल्य चिकित्सक अमरावती यांना जारी केले आहेत. त्यामुळे येवदा ग्रामीण रुग्णालयाच्या बांधकामाला आता वेग येणार आहे. खासदार डॉ. अनिल बोंडे यांचा रुग्णालय निर्माणासाठी आरोग्यमंत्र्यांकडे गतीने पाठपुरावा सुरू आहे, त्यानिमित्ताने त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. येवदा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करून शासनाने अलीकडेच या ठिकाणी ग्रामीण रुग्णालय मंजूर केले आहे. ३० खटांचे ग्रामीण रुग्णालय विशेष बाब म्हणून शासनाकडून मंजूर करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या अखत्यारित असलेले प्राथमिक आरोग्य केंद्र जिल्हा शल्य चिकित्सक अमरावती यांना हस्तांतरित करणे गरजेचे होते. जेणेकरून इमारत बांधकाम, पदभरती, वैद्यकीय उपकरणे कर्मचाऱ्यांसाठी निवासाची सोय अशा विविध बाबी या ठिकाणी विकसित करता येतील.

ही बाब लक्षात घेता येवदा प्राथमिक आरोग्य केंद्राची जागा ग्रामीण रुग्णालय निमार्नासाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांना हस्तांतरित करावी अशा स्पष्ट सूचना खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांना दिल्या होत्या. त्यांच्या या सूचनेची तातडीन दखल घेत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्रा यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र येवदा येथील जागा जिल्हा शल्य चिकित्सक यांना हस्तांतरित केली आहे. तसा आदेश देखील त्यांनी जारी केला आहे. त्यामुळे जिल्हा शल्य चिकित्सक लवकरच येवदा येथे भेट देणार आहेत. तसेच ग्रामीण रुग्णालय विकसित करण्यासंदर्भातील बाबीसाठी आढावा देखील घेणार आहेत. त्यामुळे येवदा येथील नागरिकांसाठी आरोग्य सुविधा विकसित करण्यात हे रुग्णालय मोलाचा दगड ठरणार आहे. अल्पकाळात रुग्णालयाची प्रशस्त इमारत व इतरही सुविधा विकसित व्हाव्या असा मानस खा.डॉ.अनिल बोंडे यांनी व्यक्त केला आहे.

## एखाद्या शेतकऱ्याचा जीव गेल्यावर येणार का प्रशासन, लोकप्रतिनिधींना जाग?

### घुईखेड येथे शेतकऱ्यांचा नाल्यातून प्रवास

**लोकशाही वार्ता/चांदूर रेल्वे**

जेमतेम पावसाळा सुरू झाला आहे. शेती पेरल्यानंतर जोरदार पाऊस आल्याने आता पेरल्यानंरची कामे जोमात सुरू झाली आहे. मात्र, चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड येथील काही शेतकऱ्यांना आपल्याच शेतात जाणे कठीण झाले आहे. मागिल ३-४ दिवसांत आलेल्या संततधार पावसामुळे नाल्याला पूर आला असून घुईखेड शेतशिवारात जीव धोक्यात घालून शेतकरीवर्ग या नाल्यातून प्रवास करीत आहे.

खारवगळ नाल्यावरून पुलाची मागणी अपूर्णच असून या नाल्याला पूर आल्यास अनेकवेळा मजूर शेतात अडकल्याचेही प्रकार झाले आहे. मात्र याकडे लोकप्र तिनिधींचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप शेतकरी करीत असून लोकप्रतिनिधी व प्रशासनाने तत्काळ लक्ष देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड येथील खारवगळ नाल्याच्या पलीकडे अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमीन आहेत. मात्र नाल्याच्या पाण्यामुळे पावसाळ्यात अनेक वर्षांपासून शेती वहिवाट करणे खूपच कठीण होत चालले आहेत. बेंबळा धरण झाल्याने पावसाळ्यात पाण्याच्या पातळीत वाढ होवून पर्यायी खारवगळ नाल्याचे पाणी चंद्रभागा नदीत प्रवाहीत न होता संचय होऊन सदर खारवगळ नाल्याच्या पाणी पातळीत वाढ होते. सदर पाणी शेत जमिनीत पसरत असल्याने दरवर्षी जवळपास शेती अनुक्रमांक ०१ ते ९७ गट परिसरातील शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्या शिवाय पाणी संचय पातळीत वाढ होत असल्याने शेती वहिवाट करणे कठीण होऊन बसले आहे. त्यामुळे खारवगळ नाल्यावर पुलाचे बांधकाम पूर्ण होणे गरजेचे आहे. मागील अनेक वर्षांपासून सदर पुलाचे बांधकाम होण्याकरिता परिसरातील शेतकऱ्यांनी लोकप्रतिनीधी तसेच प्रशासनाकडे वारंवार निवेदने देऊन मागणी केली आहे. त्यामुळे आता या पाण्यात एखाद्या शेतकऱ्याचा जीव गेल्यानंतरच लोकप्रतिनिधी व प्रशासनाला जाग येणार का, असा सवाल शेतकरी उपस्थित करीत आहे. तर आता या पुलाकरिता प्रशासन दखल घेणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## अतिरिक्त पावसामुळे तणांचा जोर वाढला; संत्रा उत्पादक संकटात

**लोकशाही वार्ता/वरुड**



चार दिवसांपासून पावसाची झळ यामुळे पिके तनाने जोर धरला आहे. तणनाशके फवार णीसाठी पावसाने उसंत दिली नाही. यामुळे पिकापेक्षा तन वाढले आहे. शेतकरी चिंतातूर झाला असून येणारे दिवस कसे काढले जातील या विवनचनेत शेतकरी सापडला आहे. जून महिन्यात पेरणीयोग्य पाऊस झाला. कापूस, तूर, सोयाबीन, मिरची आदी पिकांची पेरणी झाली. पिके जमिनीबाहेर आल्यावर पाऊस पडला. सतत चार दिवस पाऊस थांबला नाही. यामुळे जमिनीबाहेर आलेली पिके अतिपाण्यामुळे कासावीस झाली. यामुळे पिकापेक्षा तण मोठे झाले आहे. निंदने, डवरणे, फवारणी आदी कामे ठप्प पडली आहे. यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे.

**संत्राउत्पादक संकटात**

संत्राउत्पादक मृग बहाराच्या आशेवर होता. यातच मे महिन्यात बऱ्यापैकी पाऊस पडला. नन्तर जुन महिन्यात पाऊस बरसला. संत्राबागावर मृग बहार फुटेल ही आशा होती. पण संत्राउत्पादक अखेर निराश झाला.

**आंबिया बहाराला गळती**

ज्या शेतकऱ्यांकडे विहिरीला बऱ्यापैकी पाणी होते अशा शेतकऱ्यांनी आंबिया बहार घेतला. पण सततच्या पावसामुळे बहार अर्धअधिक जमिनीवर आला.

## हजारोंच्या गर्दीने कौंडण्यपूरला पंढरीचे रूप; आषाढी सोहळा

### आषाढी एकादशीनंतर दहीहंडी सोहळ्याला भाविकांची रेकॉर्डब्रेक गर्दी



**लोकशाही वार्ता/कौडण्यपूर**

माता रुक्मिणीचे माहेरघर असलेल्या कौडण्यपुरात दि ११ जुलै रोजी चार वाजता आषाढी पौर्णिमेच्या निमित्ताने दहीहंडी सोहळा पार पडला. आषाढी सोहळ्यानंतर दहीहंडी सोहळ्याला सुद्धा रेकॉर्डब्रेक गर्दी यावेळी पाहायला मिळाली. या दहीहंडी सोहळ्याला जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, नवनीत राणा, गायत्रीताई देशमुख, यावलीकर, आरती वानखडे, धीरज केने यांच्यासह श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर विश्वस्त व पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

या दहीहंडी सोहळ्यादरम्यान वारकऱ्यांवर दह्याचा प्रसाद उधळण्यात आला. यावेळी वारकऱ्यांचा मोठा उत्साह पाहायला मिळाला. चाळीस दिवसाचा पायदळी प्रवास करीत पंढरपुरातून परतलेल्या पालखीचे यावेळी दुपारी बारा वाजता रुक्मिणी माता संस्थाचे विश्वस्त व तहसील प्रशासनाच्या वतीने पूजन करण्यात आले. दरवर्षी गुरुपौर्णिमा आषाढी एकादशीकरिता माता रुख्मिणी संस्थाचे विश्वस्त व शेकडो वारकऱ्यांच्या उपस्थितीमध्ये जवळपास चाळीस दिवसाचा पायदळी प्रवास टाळ, मृदुंग आणि विठुरायाच्या जयघोषाने पंढरपूरकडे मार्गस्थ होते. चाळीस दिवसानंतर ही पालखी रुक्मिणीच्या दरबारात दाखल होताच वारकऱ्यांचा मोठा उत्साह पाहायला मिळाला. या दहीहंडी सोहळ्यात सात दहीहंडीतून दह्याच्या प्रसादाची उधळण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वारकऱ्यांवर करण्यात आली. या पालखी व दहीहंडी सोहळ्याच्या आयोजनाकरिता श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान कौडण्यपूरचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व विश्वस्त यांनी परिश्रम घेतले.

विदर्भ राजकन्या माता रुख्मिणीचे माहेर व भगवान श्रीकृष्णाचे सासर असलेल्या श्री क्षेत्र कौंडण्यपुरात आषाढ महिन्यात लाखो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली असून एकादशी नंतर दहीहंडी सोहळ्याला सुद्धा रेकॉर्डब्रेक गर्दी पाहायला मिळाली. कौंडण्यपूर कॉरिडॉर च्या दृष्टीने आम्ही अंबा रुख्मिणी महोत्सव समितीच्या वतीने विविध उपक्रम राबवित असून प्रत्येक उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद भाविकांकडून पाहायला मिळत आहे. ही गर्दी पाहून कौंडण्यपूर ला जणू पंढरीचे रूप आल्याचे निदर्शनास येत आहे. जणू भगवान श्रीकृष्ण कौंडण्यपूर नगरीत दर्शनाला आले, असा भास आम्हा भाविकांना होत आहे, असे प्रतिपादन रविराज देशमुख यांनी यावेळी केले.

# बोरनदी धरणाजवळील दरोड्यातील सहा आरोपी जेरबंद

**मंगेश तायडे/नांदगाव पेठ**

गत एक महिनापूर्वी दि.६ जून रोजी बोरनदी धरणावर फिरायला गेलेल्या एका युवकाला आणि त्याच्या मैत्रिणीला अज्ञात दरोडेखोरांनी मारहाण करून त्यांच्याजवळील सोनसाखळी आणि रोकड पळविली होती. याप्रकरणी नांदगाव पेठ पोलिसांनी सहा आरोपींना अटक केली असून या घटनेतील चार आरोपी अद्याप फरार आहेत. पोलीस यंत्रणेसमोर गुन्हा उघडकीस आणण्याचे मोठे आव्हान असतांना पोलिसांनी तांत्रिक व गुप्त माहितीच्या आधारे प्रशंसनीय कामगिरी केली.

फिर्यादी सिद्धांत सतीशराव राऊत (वय २८, सिव्हिल इंजिनीयर, रा. फ्रेजरपुरा अमरावती) हा युवक त्यांच्या मैत्रीणीसह बोरनदी धरण येथे गेले असता, सायंकाळी ७ वाजता घराकडे परत निघतांना तीन दुचाकींवर आलेल्या दहा अनोळखी युवकांनी त्यांना अडवले. त्यांना मारहाण करून त्यांच्याजवळील ४,५०० रुपये रोख आणि मैत्रिणीच्या गळ्यातील सुमारे ४५,००० रुपये किमतीची दहा ग्रॅम सोनसाखळी जबरदस्तीने लुटण्यात आली होती. या प्रकरणी फिर्यादी सिद्धांतच्या तक्रारीवरून नांदगावपेठ पोलिसांनी भारतीय



न्याय संहितेच्या कलम ३१०(१)(२) प्रमाणे गुन्ह्याची नोंद करून गुन्ह्यातील आरोपींची ओळख पटवण्यासाठी विशेष पथक तयार करण्यात आले. पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, आणि सहाय्यक आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे तसेच डीबी पथकाने तांत्रिक व गुप्त माहितीच्या आधारे आरोपींचा शोध सुरू केला.

अखेर एक महिन्यानंतर पोलिसांना घटनेतील आरोपींचा छडा लागला. यामध्ये आरोपी शारीक खान आबीद खान (२२, रा. फातेमानगर, लालखडी)शेख अयान शेख नसिर (२०, रा. लालखडी),मोहम्मद शोएब उर्फ भल्ला मोहम्मद आरिफ (१९, रा. यास्मीननगर),अयान खान आसिफ खान (१९, रा. यास्मीननगर), शेख शरजील उर्फ राज शेख इरफान (१९, रा. यास्मीन नगर), शहर व जिल्हा ग्रामीणमधून तडीपार असलेला आरोपी शेख अरबाज शेख मुजीब (वय २२, रा. लालखडी) या सहा आरोपींना अटक करण्यात आली. तपासादरम्यान या सर्वांनी गुन्ह्याची कबुली दिली असून या गुन्ह्यातील अन्य चार आरोपी अद्याप फरार आहेत आणि त्यांचा शोध सुरू आहे. सदर कारवाईमध्ये ठाणेदार दहातोंडे यांच्यासह पोउपनि वाणी, वाकडे, पोहेकॉं राजा राऊत, पोशि राजीक खान, नीलेश साविकार, वैभव तिखीले, राजा सय्यद, संजय नेहारे, चालक पोका वैभव धुरंदर यांनी परिश्रम घेतले. पोलिसांनी केलेल्या या मोठ्या कारवाईने गुन्हेगारांमध्ये दहशत निर्माण झाली असून बोरनदी परिसरात मॉर्निंग, इविनिंग वॉक करणाऱ्या नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे तसेच करवाईमधील पोलीस कर्मचारी यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

लोकशाही वार्ता
# यवतमाळ
गुड मॉर्निंग
नागपूर, सोमवार, १४ जुलै २०२५/१२
epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

### युवकावर चाकूने हल्ला

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

युवकावर चाकूने हल्ला केल्याची घटना घडली. याप्रकरणी फिर्यादी, फिर्यादीचा मित्र व आरोपी हे एकमेकांना ओळखत असुन फियार्दी हे गणेशजीची मूर्ती बनविण्याकरिता बांगरनगर येथे गेले असता आरोपीने दारू प्राशन करून फिर्यादीस व फिर्यादीचा मित्र यश विनोद बांगरे यास तू माझ्या वस्तीत कशाला आला असे म्हणून विनाकारण वाद करून चाकूने पोटात वार करून जखमी केले. याप्रकरणी रितेश प्रकाशराव गावंडे यांच्या तक्रारीवरून अमोल नारनवरेविरुद्ध गुन्हा नोंद केला.

### इसमाची लुना व साहित्य लंपास

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

शारदा चौक येथुन इसमाची लुना व साहित्य लंपास केल्याीची घटना घडली.

याप्रकरणी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची टी.व्ही.एस. लुना व जुना वापरता मोबाईल, तननाशक, लाईनचे बोर्ड, बुट व घड्याळ असा एकूण ३९,३०० रुपयाचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी काशिनाथ कोडापे रा. लोणी घाटाणा यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# सरकारविरोधात आंदोलन उभे करा - खा. सावंत

## आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी विधानसभानिहाय सभा घेऊन केली चर्चा

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

राज्यातील महायुती सरकार सर्वच आघाडीवर अपयशी ठरले आहे. या सरकारच्या धोरणाबाबत समस्त जनतेत प्रचंड नाराजी व असंतोष पाहायला मिळत आहे. शेतकरी, शेतमजूर, स्त्रीया, बेरोजगार, विद्यार्थी, व्यापारी, उद्योजक यांच्या समस्या सोडविण्यासाठी शिवसैनिकाने सरकार विरोधात आंदोलन उभे करावे. आगामी काळात होऊ घातलेल्या नगर परिषद, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी सर्व शिवसैनिकांनी आंदोलनाच्या माध्यमातून संघटन मजबूत केले पाहिजे, असे पश्चिम विदर्भाचे संपर्क प्रमुख खासदार




अरविंद सावंत यांनी पदाधिकारी आढावा बैठकीत सांगितले. ही बैठक शनिवारी उत्सव मंगल कार्यालयात झाली.

धोखाधडी करून सत्तेवर आलेल्या महायुती सरकारने निवडणूकी आधी राज्यातील मतदार जनेतेला मोठंमोठी आश्वासने दिली होती. मात्र आता अर्ध्या वर्षाचा कालावधी लोटूनही एकही आश्वासन पूर्ण केले नाही, असा आरोप त्यांनी केला. जिल्हा परिषद नगर परिषद निवडणुकीसाठी आपापला भाग पिंजून काढा, नागरिकांच्या समस्या जाणून घ्या त्या सोडवा, सत्ताधारी सर्वसामान्य नागरिकांची कशी फसवणूक करीत आहे दिशाभूल करून खोटे आश्वासन देत आहेत, शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी सरकार अपयशी ठरत आहे या संदर्भात सर्वसामान्य नागरिकांसोबत चर्चा करून हे सर्व विषय नागरिकांना सांगून सरकारचा खोटारडेपणा उघडा करा अशा सूचना खासदार अरविंद सावंत यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना दिल्या. विधानसभा मतदारसंघ निहाय उपस्थित पदाधिकाऱ्यांशी त्यांनी संवाद साधला.

या बैठकीला खासदार संजय देशमुख, आ. संजय देरकर, जिल्हा संपर्कप्रमुख राजेंद्र गायकवाड, जिल्हाप्रमुख प्रवीण शिंदे, किशोर इंगळे, संजय निखाडे, विधानसभा प्रमुख संतोष ढवळे, जिल्हा सचिव तुषार देशमुख, तालुका प्रमुख गजानन पाटील यांच्यासह जिल्हाभरातील शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक ही कार्यकत्यार्ची आहे. या निवडणुकीतले निर्णय स्थानिक पातळीवर घेण्याचे निर्देश पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांनी दिल्याचे खासदार अरविंद सावंत यांनी सांगितले. केवळ भाजप व शिंदे यांना आपल्या आघाडीमुळे मदत होणार नाही, याची दक्षता घेऊन स्थानिक निवडणुकीला समोर जाण्याचे निर्देश असल्याचेही खासदार सावंत यांनी सांगितले.

# चिलगव्हाण येथे ७/१२ कोरा पदयात्रेची आज सांगता

## शिवसेना नेते आ. भास्कर जाधव, आ. रोहित पाटील यांची उपस्थिती

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

शेतकरी कर्जमाफीकरिता पापळ ते चिलगव्हाण अशी पदयात्रा काढून यामध्ये सातबारा कोरा करण्याची मागणी माजी मंत्री बच्चू कडू यांनी केली. त्यांच्या नेतृत्वात सातबारा कोरा यात्रा प्रारंभ होऊन त्याचा सांगता समारंभ सोमवारी (ता.१४) जुलै रोजी महागाव तालुक्यातील चीलगव्हाण या ठिकाणी होणार आहे तत्पूर्वी अंबोडा येथे अकरा वाजता सभा आयोजित केली आहे या सभेला राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित आर.आर. पाटील, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव उपस्थित राहणार आहे.





पापळ पासून सुरू झालेली सातबारा कोरा यात्रा सुरू झाल्यानंतर आ. भास्कर जाधव आ. रोहित पाटील या यात्रेमध्ये शेकडो ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, सहभागी झाले होते यासोबतच अनेक राजकीय पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी देखील सहभाग घेतला. सातबारा कोरा हा विषय शेती आणि शेतकऱ्यांचा असल्याने यामध्ये जात-पात धर्म राजकीय पक्ष याचा कुठेही अंतर्भाव नाही असे यापूर्वीच माजी मंत्री बच्चू कडू यांनी स्पष्ट केले होते मत कोणालाही द्या पण, सातबारा कोरा यात्रेत सहभागी व्हा या आव्हानाला संपूर्ण यात्रेदरम्यान उत्कृष्ट असा प्रतिसाद मिळाला शासनाला जागे करण्यासाठी ही यात्रा असल्याचे त्यांनी सांगितल्यामुळे या राजकीय पक्षांच्या नेत्यांनी देखील आपली उपस्थिती दाखविली याच निमित्ताने १४ जुलैला अकरा वाजता अंबोडा येथे होणाऱ्या सभेत आमदार रोहित आर.आर. पाटील आणि उद्धव ठाकरे सेनेचे नेते आमदार भास्करराव जाधव हे विशेषत्वाने उपस्थित राहणार आहे.

### दृष्टीक्षेप

### चापर्डा येथे कृषी दिन उत्साहात साजरा



**यवतमाळ :** वादाफळे कृषी महाविद्यालयातील सातव्या सत्राचे कृषिदूत दयानंद वानखडे, सत्यम चेलपेलवार, कोमल वानखडे, सुहानी राऊत, हर्षदा पाटील, वैष्णवी सातपुते यांनी हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्य १ जुलैला जिल्हा परिषद कनिष्ठ प्राथमिक शाळा येथे साजरा करण्यात आला. या चापर्डा येथे कृषी दिन कार्यक्रमाचे मुख्याध्यापिका गुल्हाने मॅडम यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमात कृषीदूतांनी आधुनिक तंत्रशेती, तंत्रज्ञान, सेंद्रिय शेतीचे महत्व पटवून दिले आणि जलसंधारणाचे महत्व पटवून शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित केला. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. टी. ठाकरे, उपप्राचार्य व्ही. कडू, कार्यानुभव कार्यक्रमाच्या प्रभारी . एस. पी. लोखंडे व विषयतज्ज्ञ आडे सर या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

### मोटार लंपास

**लोकशाही वार्ता/महागाव**

कासार बेहळ परिसरातुन मोटार लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची शक्ती कंपनीची पाण्यातील सौरऊर्जा वरील मोटार किंमत १३ हजाराची चोरून नेली. याप्रकरणी सागरबाई अनिरूध्द येरेकर यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद केला.

# पद्मश्री सुभाष शर्मा यांच्या हस्ते पत्रकार नितीन पखाले यांचा सन्मान

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

सेंद्रिय शेतीतील योगदानाबद्दल 'पद्मश्री' सन्मानाने गौरविण्यात आलेले येथील सुपुत्र सुभाष शर्मा यांच्या हस्ते, पत्रकार नितीन पखाले यांचा त्यांच्या सामाजिक लिखाणाबद्दल सन्मान करण्यात आला.



रविवारी, (दि. १३) पृथ्वीराज नगरातील 'ज्योती कॅन्सर रिलिफ'च्या कार्यालयाच्या उद्घाटनासाठी पद्मश्री सुभाष शर्मा आले होते. त्यांनी सामाजिक विषयांवर सातत्याने लिखाण करणाऱ्या पत्रकार नितीन पखाले यांच्या घरी जाऊन सन्मान केला. "आपल्या लेखणीचा समाजासाठी सकारात्मक उपयोग होत असल्याची ही पावती आहे," अशी भावना पखाले यांनी व्यक्त केली. याप्रसंगी 'नंददीप'चे संदीप शिंदे आणि आर्णी येथील वृद्धाश्रमाचे संचालक खुशाल नागपुरे हेदेखील उपस्थित होते. एका पद्मश्री पुरस्कार विजेत्याने पत्रकाराच्या घरी जाऊन भेट देणे माझ्यासाठी गौरवाची बाब असल्याचे पखाले यांनी सांगितले.

# प्रवासी पळविण्यात खासगी वाहतूक अव्वल; नागरिकांना नाहक त्रास

## रस्त्यावरील प्रवासी उचलण्यास बस चालकांचा नकार

**लक्ष्मीकांत नंदनवार**

**उमरखेड :** बस थांब्याच्या ठिकाणी खाजगी वाहनाची गर्दी आणि त्यामुळे होणारी वाहतुकीची कोंडी एक गंभीर समस्या शहरात निर्माण झाली असून अनेक ठिकाणी बस थांब्यावर खासगी गाड्या , रिक्षा आणि इतर वाहने बेकायदेशीरपणे उभी राहत असल्याने प्रवाशांना नाहक त्रास होत आहे यातून वाहतूक कोंडी होत असून खासगी वाहनांनी विळखा घातला आहे. त्यामुळे प्रवाशांना व पादचाऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

पोलिस प्रशासन व वाहतूक शाखा शालेय परिसरातील बस थांबे व मुख्य चौकातील कोणतीही कारवाई करत नसल्याने खासगी वाहतूकदारांची रस्त्यावर मनमानी सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे.



### खासगी वाहनामुळे शहरात वाहतूक कोंडी

शहरात दिवसभरातून हजारो नागरिक व्यवसाय, शिक्षण, नोकरी, विद्यार्थी कामगार वर्ग यांची मोठी संख्या शहरातील विविध रस्त्याने प्रवास करीत असतात. पुसद मार्गावर अनेक विद्यालय असून शाळकरी मुलं पायदळ येत असतात. परंतु रस्त्यावर बेशिस्त पद्धतीने केली जाणारी वाहनांची पार्किंग यामुळे वाहतुकीला अडथळा होत आहे. सदर बाबीमुळे वाहन चालक व शालेय विद्यार्थी त्रस्त झाले आहेत .

शहरातील रस्ते अतिक्रमणधारकांनी व्यापले असल्यामुळे छोटे झाले आहेत व वाहतूक जास्त अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. बस स्थानक परिसर व संजय गांधी चौकात दिवसेंदिवस वाहनांची गर्दी वाढत आहेत त्यात सध्या भर पडत आहे ती खासगी ट्रॅव्हल्स बसेसची व खाजगी वाहनांची .त्यातच बस स्थानक समोर आणि गर्दीच्या ठिकाणी उभे असणाऱ्या या खाजगी ट्रॅव्हल्स बसेस मुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे .त्यामुळे वाहन चालकांना व शालेय विद्यार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

येथील संजय गांधी चौकात नेहमी मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते या बस थांब्याजवळ पुसद, दिग्रस , दारव्हा, नागपूरकडून येणारी बसेस थांबतात त्याच बाजूला खाजगी वाहने सुद्धा थांबतात. नेहमी नागरिकांची व शालेय विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ या ठिकाणी पाहायला मिळते. परंतु काही बेशिस्त वाहन चालक या बस थांब्याजवळच आपली वाहने लावतात त्यामुळे त्याच रस्त्याने येणारे शाळकरी विद्यार्थी जाणार कुठे ? असा प्रश्न उपस्थित होतो.

रस्त्याच्या मधोमध वाहतूक कोंडी करणाऱ्या खाजगी वाहनावर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. बेशिस्त वाहतुकीला लगाम लावण्यासाठी उमरखेड उपविभाग वाहतूक शाखा सबशील अपयशी ठरत असल्याचे चित्र होत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे दिसून येत आहे.

### इथे उभ्या केल्या जातात बसेस

पुसद रोड हुतात्मा स्मारका समोर , साकळे विद्यालया समोर, कृषी उत्पन्न बाजार समिती, संजय गांधी चौक या ठिकाणी बस थांबत असून निम्म्याहून अधिक रस्ता खाजगी वाहनाने व्यापलेला असतो त्यामुळे पोलिस प्रशासनाने व वाहतूक शाखेने तात्काळ दखल घेऊन खाजगी वाहनावर कडक कारवाई करण्याची मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

# अखेर ती हागणदारी हटविण्याची मोहीम नगरपंचायतने घेतली हाती

## प्रभाग क्रमांक १४ मधील नागरिकांच्या मागणीला आले यश

**लोकशाही वार्ता/ढाणकी**

ढाणकी शहरामध्ये हागणदारी मुक्त गाव ही योजना फक्त कागदावरच असल्याचे दिसून येत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून ढाणकी शहरातील प्रभाग क्रमांक १४ मध्ये खुली हागणदारी होती. यामुळे परिसरातील नागरिकांना प्रचंड प्रमाणात मानसिक त्रास सोसावा लागत होता. त्याचबरोबर सतत रोगराईसदृश वातावरण निर्माण होत होते. याबाबत ढानकी ग्रामपंचायत असताना नागरिकांनी वेळोवेळी ती हागणदारी हटवण्यासाठी निवेदन सुद्धा दिले होते मात्र, त्यावर ग्रामपंचायतने कोणतीही उपाययोजना केली नव्हती. महाराष्ट्र शासनाने हागणदारी मुक्त गाव ही योजना सुरू केली आणि घरोघरी शौचालय बांधण्यासाठी अनुदाने सुद्धा दिली. मात्र काही नागरिकांनी या योजनेचा फायदा घेतला नाही . त्यामुळे प्रभाग १४ मध्ये आजपर्यंत खुली हागणदारी चालू होती. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने यामुळे रोगराई पसरण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे त्यामुळे संतप्त नागरिकांनी याबाबत नगरपंचायतला निवेदन दिले होते. त्या निवेदनाची दखल घेत नगरपंचायतने कालपासून ती हागणदारी हटवण्याची मोहीम हाती घेतली आहे. यामुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला. या खुल्या झालेल्या जागेमध्ये आता नगरपंचायतने सौंदर्यकरण करावे अशी प्रभाग क्रमांक १४ मधील नागरिकांची मागणी आहे.



गेल्या अनेक दिवसांपासून आम्ही ही हागणदारी बंद व्हावी, यासाठी प्रयत्न करत होतो. नुकतेच आम्ही याबाबत नगरपंचायतला निवेदनसुद्धा दिले होते. त्या निवेदनाची दखल घेऊन नगरपंचायतने सदर हागणदारी हटवण्याची मोहीम सुरू केलेली आहे. सदर जागेमध्ये सार्वजनिक बगीच्या व वाचनालय सुरू करावे अशी आमची मागणी आहे.

**- परमेश्वर संभाजी ताटीकुंडलवार**
सामाजिक कार्यकर्ते, प्रभाग क्रमांक १४ ढाणकी

# डॉ.अलोणी यांचा लौकिक अधिक संपन्न व्हावा - सरपटवार

**लोकशाही वार्ता/वणी**



शैक्षणिक सामाजिक कृषी कला या विविध क्षेत्रांमध्ये आपल्या कर्तुत्वाने अनेक पुरस्कार आणि सन्मान प्राप्त करणारे लोक कलावंत डॉक्टर दिलीप अलोने यांचा लौकिक अधिक संपन्न आणि समृद्ध व्हावा, असे मत ज्येष्ठ कलावंत व सामाजिक कार्यकर्ते विदर्भ साहित्य संघाचे कार्याध्यक्ष माधवराव शरपटवार यांनी व्यक्त केले

संस्कार भारती समिती व सागर झेप बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने येथील विनायक मंगल कार्यालयात आयोजित नटराज पूजन आणि गुरुपूजन या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून सरपटवार आपले विचार व्यक्त करीत होते यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ कलावंत अशोक सोनटक्के लोक कलावंत राम झिले अर्थतज्ञ डॉक्टर करम सिंग राजपूत समितीच्या अध्यक्षा रजनीपोयाम सामाजिक कार्यकर्त्या संध्याताई अवताडे उपस्थित होते. प्रारंभी नटराज पूजन आणि गुरुपूजन करून कार्यक्रमाचा शुभारंभ झाला यावेळी डॉक्टर दिलीप अलोने व त्यांचे शिष्य लोक कलावंत राम झिले यांचा शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सागर पुणे यांनी केले व कार्यक्रमाची भूमिका विशद केली यानंतर डॉक्टर अलोने डॉक्टर करम सिंग राजपूत यांनी आपले मनोगत व्यक्त केले याप्रसंगी कौतुकास्पद कामगिरी करणाऱ्या बाल कलावंतांचाही सत्कार करण्यात आला. सांस्कृतिक शहर म्हणून वनी ची ओळख आहे या शहरात अनेक कलावंतांनी आपली कला जोपासत शहराचा सांस्कृतिक वारसा अधिक संपन्न केला आहे ही परंपरा अधिक जोमाने जोपासला गेली पाहिजे असेही सरपटवार यांनी मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन पंढरीनाथ सोनटक्के यांनी केले तर सातपुते यांनी आभार मानले यानंतर भक्ती गीतावर आधारित नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्कार भारती व सागर झेप या दोन्ही संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# भीमस्तंभ विश्वशांती बुद्ध विहारात वर्षावास आरंभ

**लोकशाही वार्ता/पांढरकवडा**

स्थानिक भीमस्तंभ विश्वशांती बुध्द विहार डॉ. बाबासाहेब आंबेडकर वॉर्ड येथे वषार्वास आरंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. बौद्ध धम्मातील वषार्वास हा काळ पवित्र मानला जातो या काळामध्ये गावोगावी, खेडोपाडी , वॉर्डावॉर्डात व प्रत्येक विहारात विश्वरत्न, बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर लिखित बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन करण्यात येते. आषाढी पौर्णिमेपासून तर अश्विन पौर्णिमेपर्यंत या ग्रंथाचे वाचन करण्यात येते.

या काळात प्रत्येक विहारात उपासक व उपासिका दैनंदिन या ग्रंथाचे वाचन करतात. आषाढ पौर्णिमेचे औचित्य साधून विहारात वषार्वास आरंभ कार्यक्रम मोठ्या थाटात संपन्न झाला. यावेळी



मंचावर भारतीय बौद्ध महासभा यवतमाळ महिला जिल्हाध्यक्षा प्राध्यापिका संघरत्ना आठवले , जिल्हा उपाध्यक्ष संस्कार विभाग व केंद्रीय शिक्षक प्रा. अण्णा मून, तालुका अध्यक्ष व केंद्रीय शिक्षक प्रा. डॉ. उत्तम शेंडे , समता सैनिक दल जिल्हा उपाध्यक्ष परमेश्वर भरणे , जिल्हा संघटिका वंदना बागेश्वर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. मून यांनी वषार्वासाचे महत्त्व या विषयावर सखोल मार्गदर्शन केले व हा काळ किती महत्त्वाचा असतो हे सर्व उपासक आणि उपासिकांना समजावून सांगितले. सोबतच प्रा. उत्तम शेंडे यांनी बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे महत्व समजावून सांगितले व नियमितपणे ग्रंथाचे वाचन करावे असे आवाहन केले. प्रा.संघरत्ना आठवले यांनी सर्व उपासक आणि उपासिकांना आषाढी पौर्णिमा व वषार्वास काळाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनीषा आकेश्वर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद रामटेके भारतीय बौद्ध महासभा शहराध्यक्ष यांनी केले. उपस्थितांचे आभार सुजाता उदकांडे यांनी मानले. यावेळी युगंधरा समाधान रामटेके यांनी विहाराला भारतीय संविधानाच्या प्रती भेट दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता दत्ताजी उदकांडे, प्रा.वासुदेव शेंद्रे , साई सागोरे सर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. दिक्षा प्रमोद रामटेके व चंदा मून यांच्यातर्फे उपस्थितांना खीरदानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता गौतमी महीला मंडळ तसेच शहरातील सर्व उपासक व उपासीका यांनी अथक परिश्रम घेतले.

# शेतकरी, शेतमजुरांच्या समस्येसाठी संजय खाडे सरसावले

## २३ जुलैला काँग्रेसतर्फे आंदोलन

**लोकशाही वार्ता/वणी**

शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार, वीज ग्राहक, महिला अत्याचार आणि वणी व परिसरातील विविध समस्यांसाठी धरणे आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे आंदोलन बुधवार, २३ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता वणी येथील तहसील कार्यालयासमोर होणार आहे. वणी, मारेगाव आणि झरी तालुका काँग्रेस तर्फे हे धरणे आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे.



काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस संजय खाडे हे या आंदोलनाचे समन्व्यक असून यांच्यानेतृत्वात हे आंदोलन होत आहे. उपविभागातील सर्वसामान्य नागरिकांनी या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन संजय खाडे यांनी केले आहे. वीज बिल माफ करावे, विजेची सातत्याने उपलब्धता करून द्यावी, शेतक-यांच्या कर्जमाफीसाठी निधी उपलब्ध करून द्यावा, पिकांना हमी भाव द्यावा, महिलांवरील अत्याचाराच्या घटनांबाबत कठोर शासन करावे, वणी परिसरातील मुलभूत सुविधा व नागरी समस्या तात्काळ सोडवाव्यात, बेरोजगारांचे प्रश्न सोडवावेत या प्रमुख मागण्यांसह इतर मागण्यांचा समावेश आहे. वणी उपविभागात शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अतिवृष्टीमुळे घरे आणि शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतीसाठी वीजपुरवठ्याचा प्रश्न अजूनही जैसे थे आहेच. वीज आणि पाणीपुरवठ्याच्या समस्यांमुळे वणीकर त्रस्त आहेत. शहरात ४-८ दिवस पाणीपुरवठा होत नाही. घाणीची व आरोग्याची समस्या कायम आहे. या समस्यांवर वारंवार निवेदने देऊनही प्रशासन त्यांचे निराकरण करण्यात अपयशी ठरले आहे. म्हणूनच हे धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

### राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचे स्वागत



**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

राजस्थानचे राज्यपाल हरीभाऊ बागडे यांचे रविवारी विश्रामगृह, यवतमाळ येथे आगमन झाले. आगमणप्रसंगी जिल्हाधिकारी विकास मीना व जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. आगमणप्रसंगी पोलिस दलाच्या वतीने राज्यपालांना मानवंदना देण्यात आली. राज्यपाल आज येथे असून उद्या दि.१४ जुलै रोजी सकाळी ८.४० वाजता गुंज, येथे नॅचरल शुगर युनिटला भेट देणार आहे. त्यानंतर ते गुंज येथून नांदेडकडे प्रयाण करतील.